**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१२३६/०२

श्री.मर्दानखॉ हैदरखां खान ------- अपिलार्थी
इस्लामपुरा, सूर्यवंशी बिल्डिग मागे,
मु.पो.ता.अंमळनेर जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी -----उत्तरवादी
अंमळनेर जि.जळगांव.

जन माहिती अधिकारी तथा तलाठी शहर
अंमळनेर जि.जळगांव

■ विवेचन

अपीलाचा दिनांक २७.१.२००९

सुनावणीचा दि.२७.११.२००९

अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपिलार्थीनी दि.१२.११.२००८ च्या अर्जान्वये मौजे अंमळनेर येथील गाव नमुना नं.६ मधील अ.क्र.१९८३ ता.१८.६.३१सर्व्हे नं.३३ मध्ये पोट हिस्सा फार्म नं.१२ मधील नोंदीची झेरॉक्स प्रत मागितली.

उपरोक्त माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीना दि.१५.११.२००८ रोजी कळविण्यांत आले. यास्तव त्यांनी दि.२०.११२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन माहती अधिकारी यांनी दिलेले उत्तर समर्पक असल्याचे नमूद करुन दि.१२.१२.२००८ रोजी निकाली काढण्यांत आले.

यावर समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थीनी आता मागितलेली माहिती यापूर्वी पण मागितली होती. माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील केले होते. त्यावर रितसर सुनावणी झाली. त्यावेळी अतिशय जुनी माहिती उपलब्ध नाही, हे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरण्यांत येऊन अपील निकाली काढण्यांत आले होते. याचा विचार करता खालील आदेश पारित करण्यांत येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढणंत येत आहे.

| | |
|---|---|
| मुंबई | (डॉ. सुरेश वि.जोशी) |
| दिनांकः १६.१२.२००९ | राज्य मुख्य माहिती आयुक्त |

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५०९८/०२

श्री.प्रमोद राजाराम पवार ------- अपिलार्थी
१२०/१३/६० राजगड,
एम.यु.टी.पी. टाटानगर रोड, मानखुर्द, मुंबई ४३

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता -----उत्तरवादी
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व मुंबई ५१

■ विवेचन

अपीलाचा दिनांक १२.१०.२००९
सुनावणीचा दि.१६.१२.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या अपिलाबाबत पुढीलप्रमाणे खुलासा अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला आहे.

वरील विषयास अनुसरुन संदर्भ क्र.४ मधील अपिलार्थीस खालीलप्रमाणे खुलासा करत आहे. अर्जदार श्री.प्रमोद राजाराम पवार यांनी दिलेल्या दुस-या अपिलात्‌ील प्रयोजनासंबंधी प्राधिकरणाचे जन माहिती अधिकारी (का.अ.)सहमत नाहीत म्हणून खालीलप्रमाणे पुन्हा दुस-यांदा खुलासा करीत आहोत.

| मुद्दा क्र | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| ३-अे | आपण कोणत्या वसाहतीमध्ये किती इमारतीचे निकृष्ट दर्जाचे पाईप काढून त्या जागी पी.डी.सी.प्लास्टीकचे पाईप बसवून दिले कृपया त्याची माहिती द्यावी. | अ. आजगांवकर प्लॉट जोगेश्वरी पूर्व येथील इमारतींना युपीव्हीसी डाऊन टेक पाईप बसविण्याचे काम पूर्ण झालेले आहे.<br>ब. वाशी नाका चेंबूर येथील इमारतींना यूपीव्हीसी डाऊन टेक पाईप बसविण्याचे काम पूर्ण झालेले आहे.<br>क. पुनम नगर जोगेश्वरी पूर्व येथील इमारतींना युपीव्हीसी डाऊन टेक पाईप बसविण्याचे काम करण्यासाठी कार्यादेश दिले आहे.<br>ड. लल्लुभाई कंपाऊंड मानखुर्द येथील इमारतींना युपीव्हीसी डाऊन टैक पाईप बसविण्याचे काम करण्यासाठी कार्य आदेश दिले आहेत.<br>इ. हरियाली व्हिलेज, कांजूरमार्ग पूर्व येथील इमारतींना युपीव्हीसी डाऊन टेक पाईप बसविण्याचे कामांच्या निविदा |

| | | |
|---|---|---|
| | | उघडण्यांत आल्या आहेत. |
| ३-ब | प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केल्यानंतर त्या इमारती पूर्ण भरेपर्यंत व पुढे सोसायटी स्थापन होईपर्यंत नोंदणी होईपर्यंत इमारतीचा दिवाबत्ती पाणी व इतर देखभालखर्च मेंटनन्स हा बिल्डर, विकसक,डेव्हलपर, म्हाडा, सिडको अशा संस्थांनी करावयाचा असतो.<br>अशी देखभाल-मेंटनन्स एमएमआरडीओ ने किती वसाहतीमधून किती इमारतींची केली व त्यापोटी प्राधिकरणाला किती खर्च आला त्याची माहिती द्यावी. तसेच प्रत्येक सभासदांकडून देखभाल खर्चापोटी किती रुपये आकारले गेले त्याची सविस्तर माहिती द्यावी. | प्राधिकरणाने दि.१५.६.२००९ चे पत्र क्र.मुं.ना.प.प्र./पु व पु/३५७/२००९ अन्वये आपणांस कळविले आहे.<br>(श्री.प्रमोद राजाराम पवार) |
| ३-सी | प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केल्यानंतर सोसायटया किती महिन्यात रजिस्टर (नोंदणी)करुन द्यायच्या असतात त्याची माहिती द्यावी व एमएमआरडीए ने किमान व कमान तसेच अद्याप किती वर्षानी सोसायटया रजिस्टर केल्या याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे सांप्रत किती सोसायटया रजिस्टर नोंदणीकृत करावयाच्या बाकी आहेत त्याची ही माहिती देण्याची कृपा करावी. | प्राधिकरणाने दि.१५.६.२००९ चे पत्रक्र.मुं,ना.प.प्र/पु, व पु/३५७/२००९ अन्वये आपणांस (श्री.प्रमोद राजाराम पवार यांना) कळविले आहे. |
| ३ डी | वाशी नाका तसेच मानखुर्द आर ॲन्ड आर साईट लल्लुभाई कंपाऊड येथील इमारतीच्या बांधकामाचा दर्जा दर्शविणारे प्रमाणपत्रांच्या ख-या नक्कल प्रती देण्याची कृपा करावी. | प्राधिकरणाचे दि.२२.६.२००९ चे पत्र क्र.अवि/मुं,ना.प.प्र./ आव्हि/माआ/०९ अन्वये आपणांस (श्री.प्रमोद राजाराम पवार यांना)कळविले आहे. तसेच दि.२७.५.२००९ च्या पत्रान्वये आपणांस रु.९२४ इतके नक्कल प्रति काढण्यासाठी प्राधिकरणाकडे जमा करण्यास कळविले होते. |

| | | |
|---|---|---|
| ३- ई | प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यानंतर त्यांच्या इमारतीना कोणीच वाली नव्हता तेव्हा सोसायटी रजिस्टर (नोंदणीकृत)होईपर्यत त्या त्या इमारतीमधील स्वयंघोषित प्रवर्तक,अध्यक्ष सचिव व त्यांची माणसे अशांनी इमारतीचा कब्जा घेतला व गोरगरीब पुनर्वसन बाधित लोकांकडून जबरदस्तीने धाक दपटशा दाखवून प्रसंगी वीज व पाणी कनेक्शन बंद करुन लोकांच्याकडून देखभाल खर्च मेटनन्स च्या नावाखाली लाखो रुपयंची खंडणी वसुल केली त्याचा हिशेब ऑडीट रिपोर्ट कुणाकडे मागावा विचारावा याचीही माहिती देण्याची कृपा करावी. | प्राधिकरणाने दि.१५.६.२००९ चे पत्रक्र.मुं,ना.प.प्र/पु, व पु/३५७/२००९ अन्वये आपणांस (श्री.प्रमोद राजाराम पवार यांना) कळविले आहे. |

अर्जदारास रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली असली तरी अर्जदाराचा मुख्य उद्देश इमारतीचे मेंटनन्स चांगल्या रितीने व चांगल्या दर्जाचे व्हावे हे आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १६.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५१००/०२

श्री.प्रविण हि.दळवी ------- अपिलार्थी
श्री.दिलीप भी. गीरकर,
परेल शीव संदेश को.हौ.सोसायटी,
बी १/१०६ कस्तुरबा गांधी नगर,
दैनिक शिवनेरी मार्ग, वरळी,
मुंबई ४०००१८

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा -----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पूर्व, मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पूर्व, मुंबई ५१

■ विवेचन

अपीलाचा दिनांक १४.१०.२००९
सुनावणीचा दि.१६.१२.२००९
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, अर्जदाराने दि.१७ मार्च २००९ रोजी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. तसेच नस्तीचे निरिक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती प्राप्त करुन घेतलेल्या आहेत असेही अर्जदारास कळविलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढणंत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १६.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५०९६/०२

श्री.शंकर रामचंद्र धुरी ------- अपिलार्थी
खो.नं.१५०, चाळ क्र.१०
वीर सावरकर नगर रहिवाशी संघ,
प्रकाश थोरात मार्ग, चेंबूर,
मुंबई ४०००६९

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा -----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पूर्व, मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पूर्व, मुंबई ५१

■ विवेचन

अपीलाचा दिनांक १४.१०.२००९
सुनावणीचा दि.१६.१२.२००९
अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

याच अपिलाच्या संदर्भात श्री.रामानंद तिवारी, आयुक्त,राज्य माहिती आयोग यांनी सुनावणी घेतली होती त्यावेळी निर्णयही झालेला आहे. "आयुक्त, बृहन्मुंबई, राज्य माहिती आयोग यांनी त्याचे आदेशात अर्जदाराकडे सर्व माहिती उपलब्ध आहे असे नमूद केलेले आहे. " व तसे या सुनावणीच्या वेळेलाही दिसून आलेले आहे.

अजुनही या झोपडपट्टी पुनवर्सन प्रकल्पास एस.आर.ए ची मान्यता मिळालेली नाही, पात्र व अपात्र व्यक्तीसंबंधीची यादीसुध्दा अंतिमत: प्राप्त झालेली नाही, असे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले. सोसायटीच्या ठरावानुसार विकासकाची नियुक्ती करण्यांत आली त्याची प्रतही अर्जदाराकडे आहे.सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढणंत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: १६.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५०८७/०२

श्री.पोर्णिमा नयन मेपानी, ------- अपिलार्थी
क्रिस्टल कोलाईडस प्रा.लि.
गाळा क्र.९ अनुपम इंडस्ट्रियल इस्टेट न.२
पी.के.रोड,मुलूंड पश्चिम, मुंबई ८०

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता -----उत्तरवादी
इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे राज लेगॅशी पेपर मिल कपाऊंड,
एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी पश्चिम मुंबई ८३

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
इमारत प्रस्ताव पूर्व उपनगरे राज लेगॅशी पेपर मिल कपाऊंड,
एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी पश्चिम मुंबई ८३

■ विवेचन

अपीलाचा दिनांक १२.१०.२००९
सुनावणीचा दि.१७.१२.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास सेल फोन टॉवर संबंधी मुंबई महापालिकेचे नियम बायलॉज वगैरेची माहिती पाहिजे होती. तसेच दिक्षित भवन प्लॉट नं.१४८ च्या टेरेसवरील सेल फोन टॉवरच्या बाबतीत दिलेल्या परवानगीबाबतची माहिती पाहिजे होती. या संदर्भात सुनावणीच्यावेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे अहवाल दिला:-

श्रीमती पुर्णिमा मेपानी यांचा दि.२८.७.२००९ रोजीचा माहितीचा अधिकार २००५ अन्वयेचा अर्ज या कार्यालयास दि.२८.७.२००९ रोजी प्राप्त झाला.

तद्नंतर या कार्यालयाने अर्जदाराने उल्लेख केलेल्या नस्तीचा शोध घेतला, परंतु दुर्दैवाने संबंधित नस्ती या कार्यालयात उपलब्ध (सापडत)नसल्यामुळे अर्जदाराला दि.२८.८.२००९ रोजी नस्ती उपलब्ध नसल्याचे कळविले.

त्यानंतर अर्जदाराने दि.१.९.२००९ तसेच दि.४.९.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव)पूर्व उपनगरे यांचेकडे अपील दाखल केले. त्यानंतर दि.१८.९.२००९ रोजी सुनावणी देण्यांत आली. त्यामध्ये सदरहू नस्ती उपलब्ध नसल्याचे सांगण्यांत आले. सुनावणी दरम्यान अज्रदाराने सेल फोन टॉवर संबंधित मार्गदर्शक/परिपत्रके देण्याची विनंती केली व त्यानुसार या कार्यालयात उपलब्ध असणा-या परिपत्रक/ मार्गदर्शक तत्वे पैकी (१) सीई/९८९/डीपीसी दि.२४.६.१९९५ (२)सीएचई/डीपी/१३ दि.१४.६.२००२ ही परिपत्रके अर्जदाराला देण्यांत आलेली आहे.

इथे असे नमूद करावेसे वाटते की, सदरहू स्थळावर या कार्यालयाने मोबाईल टॉवर बसविण्यासाठी परवानगी देण्यांत आली नाही.

परवानगीच्या बाबतीत या अहवालात महापालिकेने परवानगी दिलेली नाही, हे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. सुनावणीच्यावेळेला याबबातीत पुढील कार्यवाही वॉर्ड ऑफीस कडून होईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

उपलब्ध माहिती देण्यांत आलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १७.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१२५६/०२

श्री. विवेक नारायण पाटील ------- अपिलार्थी
राजे संभाजी चौक, बाहेरपुरा
अंमळनेर

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबधंक -----उत्तरवादी
सहकारी संस्था, जळगांव

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, जळगांव

■ विवेचन

अपिलाचा दिनांक २०.७.२००९

सुनावणीचा दिनांक २७.११.२००९

अपिलार्थी गैरहजर व प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थीनी दि.२३.९.२००८ च्या अर्जान्वये श्री. मर्चट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पारोळा जि.जळगांवशी संबंधित खालील माहिती मागितली.

१. सन २००५ ते २००८ पर्यतच्या ऑडीट रिपोर्टच्या प्रती.
२. प्रशासकांनी किती मुदत ठेव धारकांना पैसे दिले त्याचा तपशिल
३. संचालक व माजी संचालक, कर्मचारी यांनी घेतलेल्या कर्माची यादी.
४. कर्ज वसुलीचा तपशिल
५. जमा खर्चाचा आढावा
६. घेतलेल कर्ज व त्यावरील कारवाईचा तपशिल.
७. कर्जदारांची यादी
८. संस्थेची निवडणूक न घेण्याची कारणे.

उपरोक्त माहिती कार्यालयाला उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.९.२००९ रोजी संस्थेला कळविले. तथापि संस्थेकडून माहिती मिळाली नाही व ती अपिलार्थींना देता आली नाही. माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.३०.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलावर सुनावणी होऊन दि.२८.१.२००८ रोजी आदेश पारित करण्यांत आले. त्यानुसार आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थींना द्यावयाची

होती.  परंतू अपिलार्थींना माहिती मिळाली नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले की, अपिलार्थींना संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन देण्यांत आली असून याबाबत अपिलार्थींची तक्रार नाही.  सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढणंत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १९.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५०३८/०२

श्री.पल्लवी यतिन म्हात्रे ------- अपिलार्थी
शिवराम सदन बी/१७,
वीर सावकर मार्ग, प्रभादेवी मुंबई ४०० ०२५

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी -----उत्तरवादी
महाव्यवस्थापक बृहन्मुंबई दुध योजना यांचे कार्यालय
वरळी,मुंबई-१८

■ विवेचन

अपीलाचा दिनांक ४.८.२००९ व नंतरचा अर्ज दि.१९.११.२००९

सुनावणीचा दि.४.१२.२००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अर्जदाराच्या अर्जास अनुसरुन माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. मात्र त्या माहितीने अर्जदाराचे समाधान झालेले नाही.

दोन्ही पार्टीशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, १४.१२.२००९रोजी सकाळी ११.०० वाजता अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जातील व त्यांच्या समोर संबंधित विषयाची संपूर्ण नस्ती ठेवण्यांत येईल व त्यांना पहिजे असलेल्या कागदपत्राच्या प्रती लगेचच दिल्या जातील. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढणंत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ४.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९२७/०२

श्री. जी. आर. वोरा ----अपिलार्थी
प्लॉट २७५/३, गोपे निवास,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,
सायन पूर्व, मुंबई ४००० ०२२

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महापालिका एफ/नॉर्थ वॉर्ड ऑफ,
९६ भाऊदाजी रोड, माटूंगा, मुंबई १९

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (परिक्षण एफ-४)
बृहन्मुंबई महापालिका एफ/नॉर्थ वॉर्ड ऑफ,
९६ भाऊदाजी रोड, माटूंगा, मुंबई १९

■ विवेचन

श्री. जी.आर.वोरा यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, एफ नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दि.२४.६.२००९ रोजी अर्ज करुन त्यांनी ज्या तीन तक्रारी दिल्या होत्या. त्या तक्रारीबाबात माहिती मागितलेली होती. अर्जदारास एका तक्रारीच्या बाबतीत माहिती दि.२०.७.२००९ रोजीच्या पत्राने देण्यांत आली व उर्वरित दोन तक्रारीच्या बाबतीत सद्य:स्थिती ही दि.१०.८.२००९ रोजीच्या पत्राने कळविण्यांत आली अर्जदारास मुदतीत उत्तर न दिल्यामुळे त्यांनी दि.२५.७.२००९ रोजी प्रथम अपिल केले मात्र या अपिलाच्या सुनावणीस अपिलकर्ते गैरहजर होते. मात्र त्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी असे सांगितले अर्जदाराबरोबर दूरध्वनीवरुन संपर्क साधून चर्चा करण्यांत आली. अर्जदारास सद्य:स्थितीबाबत माहिती देण्यांत आली या संदर्भातील कागदपत्रे पाहावयाची असल्यास अर्जदार ते पाहून आवश्यकत्या कागदपत्राच्या प्रती प्राप्त करुन घेऊ शकतात असेही अर्जदारास कळविण्यांत आले आहे म्हणून त्यामुळे प्रथम अपिल हे निकाली काढण्यांत आले.

या विरुध्द अर्जदाराने आयोगाकडे दि.८.९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपिलाची सुनावणी दि.३०.१०.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराच्या अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने जन

माहिती अधिकारी यांनी त्यातील मुद्यांच्या बाबतीत एक विस्तृत निवेदन आयोगास व अर्जदारास दिलेले आहे व हया पत्रानुसार व्दितीय अपिल दाखल केल्यानंतरही जन माहिती अधिकारी हे अर्जदाराच्या संपर्कात होते व अर्जदारास हवी असलेली माहिती त्यांनी दि.७.१०.२००९ रोजी कार्यालयात जाऊन प्राप्त करुन घेतलेली आहे. सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे निष्पन्न झाले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

**अपील निकाली काढणेत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ३०.१२.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४१७७/अपील क्रमांक ५०३६ /०२**

**श्री. अब्दुल मतीन हदाई अब्दुल रशीद -----अपीलार्थी**
**अक्रामा इकबाल स्कूलच्या बाजूला, दु:खी नगर,**
**जुना जालना, ता.जि. जालना -- ४३१ २१३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव -----उत्तरवादी**
**व सहमुख्य निवडणूक अधिकारी**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (का ३३)**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३/९/२००९**
**सुनावणीची तारीख ४/१२/२००९**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी उपस्थित.**
**जन माहिती अधिकारी हे सुनावणी झाल्यानंतर उपस्थित.**

**अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.**

**लोकसभा निवडणूक २००९ साठी आपल्या कार्यालयामार्फत महाराष्ट्रातील एकूण ४८ मतदार संघासाठी स्टेशनरी निवडणूक स्टेशनरी पुरविण्यात आली आहे. त्यासंबंधी**

कोणत्या ठेकेदाराकडून स्टेशनरी खरेदी करण्यात आली त्यासंबंधी बिलाची प्रत व स्टेशनरी खरेदीची यादी त्याला किती रक्कम अदा करण्यात आली त्याची सविस्तर माहिती.

याबाबत अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

अपीलार्थी यांनी आपली बाजू मांडताना असे विषद केले की, त्यांना ज्या अभिकर्त्यामार्फत स्टेशनरीची खरेदी करण्यात आलेली आहे त्या अभिकर्त्याची माहिती व त्यासाठी आलेला खर्च व त्याची बिले इ. माहिती आवश्यक आहे. जन माहिती अधिका-यांनी अशी माहिती दिलेली नाही. त्यावर अपीलार्थींना असे स्पष्ट करण्यात आले की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २००९ करीता लागणारी सर्व स्टेशनरी संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई --४ यांचेकडून पुरवठा करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांनी कोणत्या अभिकर्त्यामार्फत व कोणत्या दराने ही खरेदी केलेली आहे याबाबतची माहिती त्यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होऊ शकेल. यावर अपीलार्थींचे समाधान झाले असून अशी माहिती त्या कार्यालयाकडून आपण घेऊ असे त्यांनी मान्य केले.

वास्तविक पाहता जर अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय हे चांगल्या रितीने देऊ शकेल असे वाटत होते तर सुरुवातीसच हा अर्ज त्या कार्यालयास पाठविणे आवश्यक होते याची नोंद जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी. अपीलार्थी यांनी शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाकडे अर्ज केलेला आहे असे सुनावणीच्या वेळेस सांगितले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ४ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५१६/अपील क्रमांक ५०३५/०२

श्री. डि. एम. शाह -----अपीलार्थी
७३, आशा, ६ वा मजला,
आशादिप को.ऑप.हौ.सोसायटी.
२३, डोंगरर्शी रोड, मलबार हिल, मुंबई - ६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
उपनिबंधक सहकारी संस्था डी वार्ड,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट , मुंबई १.

२. जन माहिती अधिकारी
उपनिबंधक सहकारी संस्था डी वार्ड,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट , मुंबई १.

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २४/९/२००९**
**सुनावणीची तारीख ४/१२/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

**अपीलार्थीस आशादिप को.ऑप.हौसिंग सोसायटीवर नियुक्त करण्यांत आलेले प्रशासक प्रत्यक्ष कागदपत्रांचा ताबा का घेऊ शकले नाहीत याबाबतची माहिती पाहिजे होती.**

**सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, यासंदर्भात संस्थेच्या पदाधिका-यांनी कागदपत्रे देण्यास दिलेला नकार, त्यानंतर तहसिलदार व दंडाधिकारी यांनी पोलीसांना कागदपत्रे ताब्यात घेऊन प्रशासकास ते देण्याचे दिलेले निर्देश, जॉईंट रजिस्ट्रार ऑफ को.ऑप.सोसायटीज यांनी प्रशासक नेमणूकीस दिलेले स्थगन आदेश व अंतिमतः शासनाने पारित केलेले आदेश या सर्व बाबींची माहिती अपीलार्थींकडे आहे. त्यांनी आता हायकोर्टात यासंदर्भात पिटीशन दाखल केलेले आहे असेहि सागितले.**

**अपीलार्थीस प्रशासक नियुक्ती व संस्थेचा ताबा घेणे यासंदर्भात कोणतीही कागदपत्रे पाहायची असल्यास ती ते पाहू शकतात असे सांगण्यांत आले. त्यानुसार दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, दि. १४ डिसेंबर, २००९ रोजी सकाळी ११-०० वाजता अपीलार्थी जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जातील व त्यांना सर्व कागदपत्रे दाखवून अपीलार्थींनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक ४ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/२९११४/अपील क्रमांक ५०३७/०२**

**श्री. जे.जी. टंडन -----अपीलार्थी**
**१२, रिटस, ८७ एन.बी पाटील मार्ग,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**पोलीस उपआयुक्त झोन-६, चेंबूर, मुंबई ७१,**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ६/१/२००८
सुनावणीची तारीख ४/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थींचे याच विषयावरील अपील क्रमांक २००९/४६५७/०२ संदर्भात आयोगाने याअगोदरच दि. १५/९/२००९ रोजी आदेश पारित केलेले आहेत. त्या आदेशाची प्रत अपीलार्थीस पाठविण्यांत आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ४ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४१९००/अपील क्रमांक ४८३९/०२
क्रमांक-मु.मा.आ/४१९०२/अपील क्रमांक ४८४०/०२
क्रमांक-मु.मा.आ/४१९०३/अपील क्रमांक ४८४१/०२

श्री. सिरिल पिटर डिसोजा -----अपीलार्थी
आवाज सामाजिक विकास सेवा संस्था,
बी.सी.बोर्जीस चाळ, सागर हॉटेल मागे,
अप्पर लोअर खारोडी, मालाड (पश्चिम) मुंबई ९५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पी/ उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०६४.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का. )
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पी/ उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०६४.

***---विवेचन---***

अपील क्रमांक ४८३९/०२,४८४०/०२, ४८४१/०२ मधील दि. ९ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या आदेशात अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत खुलासा सादर करण्यास जन माहिती अधिकारी यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे -

"१. दानापानी रोड मढ पुनावाला बंगल्याच्या शेजारी सर्व्हे क्र. २१, हिस्सा क्र.१ येथे करण्यात आलेल्या बांधकामाच्या तक्रारीबाबत एम.एम.सी. ॲक्ट प्रमाणे ३५१ ची नोटीस सन २००७-०८ ला देण्यात आली व पक्षकाराने प्लानची प्रत (Approvable ) क्र. CE/374/Lop दिनांक ३०/६/७४ सादर केली त्याची छायांकित प्रत उपलब्ध असून अर्जदाराला प्राप्त करुन देणेत येईल.

२. मालाड (पश्चिम), एस.व्ही. रोड, राणी सती नगर येथील दुकानांच्या वाढीव बांधकामाबाबत सदर ठिकाणी म.न.पा अधिनियम ३५१ खाली २००७-०८ साली नोटीसा बजावण्यात आल्या त्याविरुध्द पक्षकारांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले असून त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध असून त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन अर्जदारांना प्राप्त करुन देणेत येतील.

३.	मालाड (पश्चिम) येथील एस.व्ही.रोड येथे असलेल्या संजर फर्निचर या दुकानाच्या आत करण्यात आलेल्या पोटमाळयाच्या अनधिकृत बांधकामाची माहिती दिलेली असून तक्रार इमारत प्रस्ताव खाते, कांदिवली यांचेकडे पाठविण्यात आली असे अर्जदाराने स्पष्ट केले आहे.	याबाबतीत संबंधित कनिष्ठ अभियंता रजेवर असून तो कामावर रुजू झाल्यावर सदरची प्रत प्राप्त करुन देणेत येईल.	"

वरील कार्यवाही ही १५ दिवसांच्या आंत पूर्ण करावी असे निर्देश देण्यांत आले. शास्तीची आवश्यकता नाही.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ४ डिसेंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४७१९/अपील क्रमांक ५०४१/०२

श्री. विन्सेंट जोसेफ फर्नांडिस	-----अपीलार्थी
२६, च्युम व्हिलेज, खार (पश्चिम)

मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/पश्चिम विभाग, सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/पश्चिम विभाग, सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २१/१०/२००९
सुनावणीची तारीख ४/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी यांना हाऊस नं ३० अे, सिटीएस डी/९७१ जुहू च्यूम व्हिलेज, खार (पश्चिम) या संदर्भात तेथील घराचे कर निर्धारण केले असेल त्यासंदर्भात माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस पुढीलप्रमाणे कळविण्यात आले.

**The property bearing HW-227 4(2) situated at 30/A chium A/c No09-0128-00-3 representing “HOUSE” at present at assessed to Municipal taxes as per printed plate initially prior to 61-62. However, as per available records for last fifteen year i.e. for the year 1993-94 the**

**property assessed at Rateable Value Rs.275/- NPA(R) but status of the structure prior to 1993-94 is not known.**

**The first date of assessment is applicable to the original structure and not to the subsequent changes.**

**The Rateable Value of the property is Rs.275/-NPA(R) at present. This information is furnished to you on payment of Scheduel Fee (Rs.230/- per property per year.)**

**जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही योग्य अशीच आहे असा निर्वाळा प्रथम अपीलातहि देण्यांत आला. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे की, रेकॉर्डप्रमाणे दिलेली माहिती ही अचूक आहे. तर अपीलार्थीचे म्हणणे असे की, त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली बिल्डींग परमिशन डिपार्टमेंट कडून माहिती घेतली असता त्या कार्यालयात सन १९६६ साली फाईल सबमिट करण्यात आली होती असे नमूद केलेले आहे. त्यांचा सवाल सहाजिकच १९६१ सालापासून कर निर्धारण कसे होईल हा आहे. . तर रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली आहे यावर जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक ठाम आहेत.**

**माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत दोन्ही विभागाकडून अपीलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. त्यामुळे रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली आहे असे जरी दिसून येत असले तरी त्यातील विसंगतीबाबत अपीलार्थीचे समाधान होणे तेवढेच गरजेचे आहे. त्यामुळे अपीलार्थीनी महापालिका आयुक्तांकडे या विसंगतीबाबत अर्ज करावा व योग्य त्या अधिका-यांकडून कागदपत्रांची पडताळणी करुन आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा असे याठिकाणी सुचविण्यात येत आहे.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ५ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**
**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४७२५/अपील क्रमांक ५०३९/०२**

**श्री. राजाराम भिवशेठ नर -----अपीलार्थी**
**फुलराणी रो हाऊस, प्लॉट नं. ८१/१०७,**
**आर.एस.सी. ६, सेक्टर २, चारकोप**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा दुय्यम निबंधक -----उत्तरवादी**
**दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**कौटुंबिक न्यायालय इमारत, तळमजला,**
**वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक**
**दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**कौटुंबिक न्यायालय इमारत, तळमजला,**
**वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १०/१०/२००९**
**सुनावणीची तारीख ४/१२/२००९**

अपीलार्थी , जन माहिती अधिकारी  तसेच अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

सर्व कागदपत्रांचे वाचन केल्यानंतर व दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की,  अपीलार्थींना कोणतीही कागदपत्रे  वा माहिती नको आहे.  त्यांनी मिळकतीचा व्यवहार केल्यानंतर रजिस्ट्रेशनसाठी पहिल्यांदा त्या दस्तऐवजातील जे मुद्रांक शुल्क दाखविलेले आहे ते भरणा करावे असे पत्र नगर रचनाकार कार्यालय यांनी दिले होते. मात्र त्यानंतर  २००८ साली त्यांना असे कळविण्यांत आले की, हे प्रकरण कमी पडलेले मुद्रांक शुल्क भरण्यासाठी तहकूब  ठेवण्यात आले  होते.  असे कां व्हावे  हा त्यांचा प्रश्न आहे.

ज्यावेळेला मुद्रांक शुल्क वाढीचे प्रकरण कार्यालयात चालू होते त्यावेळेला अपीलार्थींना बोलावूनहि ते गेलेले दिसत नाहीत.  त्याचप्रमाणे  माहितीच्या अधिकाराखाली अपीलाच्या सुनावणीस सुध्दा ते उपस्थित राहिलेले दिसत नाहीत.

अपीलार्थीस जन माहिती अधिका-यांनी पुढीलप्रमाणे कळविले होते.

"उपरोक्त संदर्भित अर्जान्वये , आपण या कार्यालयात दि. २०/१०/९२ रोजी फ्लॅटचा करारनाम्याचा दस्त क्र.पी- २८११/९२  बाबत विचारणा केलेली आहे.

सदर अर्जाच्या मुद्दा क्र. ४ मध्ये आपण या कार्यालयाच्या अधिनस्त सह दुय्यम निबंधक बोरीवली  क्र. ४  या कार्यालयाकडून आलेल्या नोटीस क्र. २६०९/०८  दि. १०/११/२००८ चा उल्लेख केलेला आहे.  सदर नोटीस सह दुय्यम निबंधक  बोरीवली क्र. ४ कडून दस्त  क्र.पी-८२११/०८ करीता देणेत आलेली आहे.

सबब आपण संदर्भित अर्जान्वये केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत निश्चित कोणत्या दस्तासंबंधात विचारणा केलेली आहे, याचा बोध होत नाही.

तसेच सदर अर्जासोबत, आपण नगर रचनाकार, मुद्रांक व मुल्यांकन, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील दस्त क्र. पी-८२११/९२ व पी-२८१२/९२ या दोन दस्ताचा मुल्यांकनाबाबतच्या अहवालाची प्रत देखिल जोडली आहे.

तथा आपणास विनंती करणेत येते सदर अधिनियमांतर्गत आपले अर्जाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेचे दृष्टीने , दस्ताचा योग्य अनुक्रमांक निश्चित करणेकरीता आपण दि. २०/८/२००९ रोजी आपलेकडील दस्ताच्या नोंदणीच्या पावतीसह या कार्यालयात उपस्थित रहावे जेणेकरुन दस्त नोंदणीची कार्यवाही करणे सुलभ होईल. "

मात्र अपीलार्थीस आपणाला एकदा मुद्रांक शुल्क योग्य आहे असे दर्शविल्यानंतर पुन्हा त्यात बदल का व्हावा असे तांत्रिकदृष्टया वाटते म्हणून ते कुठच्याहि प्रोसिडिंगला उपस्थित राहिले नाहीत. तेव्हा अपिलीय अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत आले की, अपीलार्थींना सर्व कागदपत्रे ही समजावून सांगण्यात यावीत व त्यांना ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील जेणेकरुन त्यांना पडलेल्या प्रश्नांचा उलगडा होऊ शकेल अशी सर्व कागदपत्रे त्यांना विनामूल्य देण्यांत यावीत. तसेच मुद्रांक शुल्क रिव्हीजनच्या बाबतीत कायद्याखाली कांही कार्यवाही करणे अपीलार्थीकडून आवश्यक असल्यास त्यासंबंधीहि योग्यते मार्गदर्शन त्यांना देण्यांत यावे.

<u>*---आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यांत येत आहे
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ५ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४७२८/अपील क्रमांक ५०२०/०२**

**श्री.अब्दुल वाहिद दिन मोहम्मद शेख -----अपीलार्थी**
**अंडर ट्रायल क्र. १००२७, अंडा सेल,**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह , मुंबई.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक -----उत्तरवादी**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह, साने गुरुजी मार्ग,**
**चिंचपोकळी, मुंबई ४०० ०११.**

**२.जन माहिती अधिकारी**

मुंबई मध्यवर्ती कारागृह, साने गुरुजी मार्ग,
चिंचपोकळी, मुंबई ४०० ०११.

*---विवेचन---*

मोक्का स्पेशल केस क्र. २१/०६ न्या.बंदी अब्दुल वाहिद दिन मोहम्मद शेख यांनी दि. २१/१०/२००८ रोजी सादर केलेल्या अपीलाची सुनावणी दि. ४ डिसेंबर, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी त्यांच्या दि. १८/१/२००८ रोजीच्या अर्जाने ३९ मुद्दयांवर माहिती विचारली होती. ही माहिती मुद्देनिहाय अपीलार्थीस दि. २६/२/२००८ रोजी कळविण्यांत आली. त्याने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलात मुद्दा क्र. ३० व मुद्दा क्र. ३२ च्या बाबतीत दि. १६/६/२००८ रोजीच्या आदेशाने अतिरिक्त माहिती देण्यास आली.

अपीलार्थीच्या अपीलात अपूर्ण माहिती देण्यांत आली आहे असे नमूद केलेले आहे. पण कुठच्या मुद्दयावर माहिती अपूर्ण वाटते याचा उल्लेख नाही.

अपिलीय अधिका-यांनी निर्णय देण्यास उशिर लावला असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे. त्याबाबतीत सदरील तुरुंगात ८०४ बंदयांच्या सुरक्षेसाठी असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांचेवर २५०० बंदयांच्या सुरक्षेची जबाबदारी असल्यामुळे प्रशासनावर अतिशय ताण पडतो व या अति व्यापामुळे अपीलाचा निर्णय देण्यास थोडा विलंब झालेला आहे असे स्पष्टीकरण देण्यांत आले ते मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीच्या अपीलात विशिष्ट असे कोणतेही मुद्दे नसल्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ५ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४७२७/अपील क्रमांक ५०४०/०२

श्री.राजेंद्रकुमार कृष्णा शिरकर -----अपीलार्थी
७३-सी/ २१, मन्नुभाई भगवानदास चाळ,
जगन्नाथराव भातणकर मार्ग, एलफिन्स्टन रोड,
मुंबई ४०० ०२५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक -----उत्तरवादी
सहकारी संस्था (३) मुंबई गृहनिर्माण भवन,
कक्ष ६९, तळमजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था
आर विभाग, मुंबई ३१६/ अे/१ इमारत,
३ रा मजला, ट्रक टर्मिनल, आर.टी.ओ ऑफिसजवळ,
वडाळा (पूर्व) मुंबई ४०० ०३७.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/१०/२००९
सुनावणीची तारीख ४/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस साईकृष्णा वाटिका को.ऑप.हौसिंग सोसायटी बाबत बंधपत्रे, सुधारित सोसायटीने तयार केलेल्या उपविधीची प्रत ही माहिती पाहिजे होती. याबाबतीत उपलब्ध बंधपत्रे याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेल्या सदस्यांच्या बंधपत्राच्या प्रती देण्यांत आल्या. अपीलार्थीचे म्हणणे की, यापूर्वीच्या समितीच्या सदस्यांच्या बंधपत्राच्या प्रती व त्यासंबंधी माहिती पाहिजे आहे. तेव्हा ही माहिती अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले. सोसायटीने स्वतंत्र तयार केलेल्या उपविधीच्या प्रतीच्या बाबतीत अशा प्रकारची कुठचीही प्रत मान्यतेसाठी उपनिबंधक कार्यालयास पाठविण्यांत आलेली नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

**प्रमाणित उपविधीची प्रत ही स्वतंत्र सहजतेने उपलब्ध आहेच. संस्था स्तरावरची माहिती शक्यतोवर ही संस्थेकडून सदस्यांनी घ्यावी हा सल्लाहि योग्यच आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***<u>----आदेश---</u>***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**बंधपत्रासंबंधीची माहिती अपीलार्थीस देण्यांत यावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ५ डिसेंबर, २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४०३६/अपील क्रमांक ५०५०/०२**

**श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट,**
**डॉ. राजाबली पटेल लेन समोर,**
**बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियता (परि) ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**टी वार्ड, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परि)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**टी वार्ड, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८०.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ४/९/२००९
सुनावणीची तारीख ५/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती प्रथम दि. ४/८/२००९ रोजी देण्यांत आली व प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानंतर अतिरिक्त माहिती दि. १२/१०/२००९ रोजी देण्यांत आली आहे असे दिसून आले. त्या व्यतिरिक्त वॉर्डमध्ये अपीलार्थींच्या मुद्दयासंबंधी इतर कोणतीही माहिती नाही असेहि जन माहिती अधिकारी यांनी सांगितले, व उपलब्ध सर्व माहिती प्रयत्नपूर्वक
संकलीत करुन देण्यांत आलेली आहे असेहि निवेदन दिले.

अशा स्वरुपाची माहिती इतर वॉर्डाकडूनहि अपीलार्थीस अपेक्षित होती व ज्या वॉर्डांच्या माहितीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले त्याच पध्दतीची माहिती याहि वॉर्डाकडून देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ५ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४७३३/अपील क्रमांक ५०५७/०२**

**श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट,**
**डॉ. राजाबली पटेल लेन समोर,**
**बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्या १) ----उत्तरवादी**
**पोलीस आयुक्त कार्यालय, तळमजला,**
**क्रॉफर्ड मार्केट पोलीस स्टेशन, मुंबई ०१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या १)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, तळमजला,**
**क्रॉफर्ड मार्केट पोलीस स्टेशन, मुंबई ०१.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक  २०/१०/२००९
सुनावणीची तारीख  ५/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या दि. १७ ऑगस्ट, २००९ रोजीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी  मुंबई पोलीस आयुक्तालय यांच्याकडून सहायक पोलीस आयुक्त यांच्या बदल्याचे प्रस्ताव,  त्यांच्यासंबंधीचे नोटींग , सह पोलीस आयुक्तांच्या बदल्यांचे निकष, रद्द झालेल्या बदल्या वगैरे बाबत माहिती पाहिजे होती.

कांही माहिती सुरुवातील व कांही माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर अपीलार्थीस देण्यांत आली.   द्वितीय अपीलात अपीलार्थींनी उपस्थित केलेले मुद्दे व त्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे.  -

"	**PIOs  Desk3 Officer Mr. Jadhav knowingly furnish the in complete information ofter the 1 st appellate order.  He has not provide Letters of Recommendation, Proposals, Transfer, Request to concelposting, Copt of noting.**

खुलासा --

प्रथम अपीलातील आदेशानुसार ग.अ.चौधरी, अधीक्षक कक्ष -३  (वरिष्ठ आस्थापना) यांनी पुरविलेली माहिती अर्जदारास या कार्यालयाचे पत्र जा.क्र. ४९६/सपोआ/मुख्या-१/माहिती/२००९, दि. १६/१०/२००९ अन्वये माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह पुरविण्यात आलेली आहे.   अर्जदाराने अपीलामध्ये सहायक पोलीस आयुक्तांच्या बदल्याबाबतची मागणी केलेली शिफारस पत्रे पुरविलेली नाहीत असे म्हणणे आहे.   याबाबत खुलासा करण्यात येतो की, दि. १/८/२००८ ते १७/८/२००९ या कालावधीमध्ये कक्ष-३ (वरिष्ठ आस्थापना) कार्यासनास सहायक पोलीस आयुक्तांच्या

बदल्यांच्या अनुषंगाने संबंधिताकडून एकही शिफारस पत्र प्राप्त झाल्याची त्यांच्या अभिलेखावर नोंद नाही.

मुंबईतील सहायक पोलीस आयुक्तांच्या बदल्याबाबत शासनास कक्ष-३ (वरिष्ठ आस्थापना)या कार्यासनाकडून त्यांचे पत्र १) जा.क्र.१३८/०९ दि. ०१/०८/२००९ व २) जा.क्र.११८/०९ दिनांक २२/६/२००९ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. त्याबाबतची माहिती अर्जदारास पुरविण्यात आलेली आहे.

अर्जदारास बृहन्मुंबई पोलीस आस्थापनेवर कार्यरत तसेच बदलीवर नेमणूका दर्शविलेल्या सहायक पोलीस आयुक्तांच्या नेमणूक/बदली बाबतचे शासन आदेश पत्र १) क्रमांक रापोसे-१७०९/प्र.क्र. ४२२/पोल-१ अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १२/८/२००९ २) क्रमांक. रापोसे-- १७०९/प.क्र.३५७/पोल १ अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक १४/७/२००९ ३) क्रमांक. रापोसे --- १७०९/प्र.क्र.३३६/पोल-१ अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १३/७/२००९ अन्वयेच्या पत्राच्या प्रती अर्जदारास पुरविण्यात आलेल्या आहेत.

सहायक पोलीस आयुक्त, श्री. दत्ता सं. ढवळे, पोलीस कल्याण निधी यांनी त्यांचा अर्ज दि. ७/२/२००९ अन्वये तसेच सहायक पोलीस आयुक्त श्री. बापु द कटकदौंड, सशस्त्र पोलीस दल वरळी यांनी त्यांचा अर्ज दिनांक ४/२/२००९ अन्वये यांनी बदली रद्द होण्याबाबत केलेल्या अर्जाच्या प्रती अर्जदारास यापूर्वीच पुरविण्यात आलेल्या आहेत.

जे सहायक पोलीस आयुक्त जिल्हा बदलीवरुन मुंबई पोलीस दलात दिनांक २९/६/२००९ पर्यंत हजर झालेलया ७ सहायक पोलीस आयुक्तांच्या मुंबईतील नेमणूकीबाबत तसेच त्यानंतर जिल्हा बदलीवरुन मुंबई पोलीस आस्थापनेवर दर्शविलेल्या १३ तसेच मुंबई पोलीस दलातील ३ सहायक पोलीस आयुक्तांच्या मुंबईतील पोलीस दलात नेमणूकीबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबतचे टिप्पणीची प्रत अर्जदारास पुरविण्यात आलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय-१) यांनी कार्यालय अधीक्षक, कक्ष-३ (वरिष्ठ आस्थापना) पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती अर्जदारास दिलेली आहे. "

सुनावणी चालू असतांना सॅम्पल बेसीसवर अपीलार्थीसमोर यातील कांही माहिती ही पडताळून पाहण्यात आली, व अपीलार्थीस ती माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. अपीलार्थींनी गृह विभागाकडे सुध्दा याच माहितीच्या संदर्भात अर्ज केलेला आहे व त्यात विभागातील नस्त्यांची पाहणी सुध्दा ते करणार आहेत. तेव्हा त्यांना दिलेली माहिती पुन्हा एकदा पडताळून पाहण्याची संधी निश्चितपणे प्राप्त होणार आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

---आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ७ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४०३७/अपील क्रमांक ५०५१/०२

श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन समोर,
बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (मेंटेनन्स) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एम/पश्चिम विभाग, एम विभाग कार्यालय इमारत,
शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एम/पश्चिम विभाग, एम विभाग कार्यालय इमारत,
शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४ सप्टेंबर, २००९
सुनावणीची तारीख ५/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलातील मुळ अर्जानुसार अपीलार्थीना अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बाबतीत केलेल्या कारवाईसंबंधीची माहिती पाहिजे होती. ती विहित मुदतीत मिळाली नाही असे अपीलार्थीचे अपीलातील म्हणणे आहे. अपीलार्थीस अंतिमतः माहिती दिली असे दिसून येते.

यासंबंधी विस्तृत असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी दिलेला आहे.

" मा.महापालिका आयुक्त यांच्या कार्यालयात दि. २४/३/२००९ रोजी प्राप्त झालेला केंद्रीय

माहितीचा अधिकार-२००५ अन्वयेचा विनंती अर्ज, सार्वजनिक माहिती अधिकारी , कार्यालय अधीक्षक (एस.जी.सी.)यांचेकडून दि. २६/३/२००९ रोजी एम/पश्चिम विभाग कार्यालयात प्राप्त झाला. म्हणजेच यामध्ये ०३ दिवस व्यपगत झाले. तद्नंतर माहिती अधिकाराच्या अर्जात प्रार्थना स्थळाच्या जागेचा उल्लेख नसल्याने खाजगी जागेवरील माहिती प्राप्त करण्याकरिता मा.सहायक आयुक्त, एम/पश्चिम विभाग यांचेमार्फत दि. २६/०३/०९ रोजीचा प्राप्त झालेला अर्ज निम्नस्वाक्षरीकारांनी सहायक अभियंता (इमारत व कारखाने) एम/पश्चिम विभाग यांचेकडे दि. ३१/३/२००९ रोजी खाजगी जागेवरील प्रार्थना स्थळांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता पाठविला. त्यामध्ये ६ दिवस व्यपगत झाले. त्यानंतर सदर अर्जावर सहायक अभियंता (इ.व.का)एम/पश्चिम विीाग यांनी अर्जात विचारलेली माहिती आपल्या विभागाशी संबंधित नाही असा अभिप्राय नोंदवून दि. ६/४/२००९ रोजी पुन्हा सहायक अभियंता (परिरक्षण )एम/ पश्चिम विभाग यांचेकडे पाठविला. त्यामध्ये ६ दिवस व्यपगत झाले. तद्नंतर सहायक अभियंता (परिरक्षण ) एम/पश्चिम विभाग यांचेकडे दि ११/४/२००९ रोजी पुन्हा सदर अर्ज प्राप्त झाला. त्यामध्ये ६ दिवस व्यपगत झ ााले. असे एकूण २१ दिवस व्यपगत झाले. हे सर्व दिवस कार्यालयीन टपाल प्रक्रियेमुळे व्यपगत झाले आहेत.

तसेच सदर विषयाबाबतची माहिती देण्याबाबतची दुसरी सूचना उपमुख्य अभ्यिंता (विकास नियोजन -१) यांचेकडे दि. २६/३/२००९ रोजी सुध्दा प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (विकास नियोजन-१) यांनी मागितलेली माहिती विभाग कार्यालयाशी संबंधित असल्याने, त्यांनी पत्र क्र. सीएचई/१४४३/डीपीसी/जन/आरआयए-०५ दि. ६/४/०९ अन्वयेच्या जावक क्रमांकानुसार सदर पत्र विभाग कार्यालयात पाठविले आणि सदर पत्र दि. ९/४/२००९ रोजी एम/पश्चिम विभाग कार्यालयात प्राप्त झाले. त्यामध्ये १४ दिवस व्यपगत झाले. तद्नंतर एम/पश्चिम विभाग कार्यालयातील आवक-जावक विभागातून जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण) एम/पश्चिम

विभाग यांचेकडे दि. १५/४/०९ रोजी प्राप्त झाले. त्यामध्ये ६ दिवस व्यपगत झाले असून एकूण २० दिवस व्यपगत झाले.

परंतु प्रत्यक्षात पहिली सूचना प्राप्त झाल्यानंतर म्हणजेच दि. ११/४/२००९ रोजी अर्जात नमूद माहिती देण्याविषयी तयारी सुरु करण्यात आली होती. तसेच अर्जात नमूद माहिती गत दहा वर्षामधील हवी असल्याने, तशा पध्दतीने कार्यालयीन नोंदी, फाईल्स इत्यादिचा शोध घेण्यात आला. तसेच सध्या कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण)एम/पश्चिम विभाग आणि त्यांचा सहकारी कर्मचारी वृंद हा २००८ पासून एम/पश्चिम विभाग कार्यरत असल्याने आणि माहिती अर्जात नमूद केलेली माहिती अगोदर पासून असल्याने, संबंधित तत्कालीन अधिका-यांशी संपर्क साधणे, पूर्वी कारवाई केलेल्या प्रकरणाच्या फाईल शोधणे व योग्य माहिती मिळविणे या प्रक्रियेत साधारणपणे २५ ते ३० दिवसांचा कालावधी लागला आहे. तसेच वरील अथक प्रयत्न केल्यानंतर मिळालेल्या फाईलमध्ये उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी अपीलार्थींना देऊ शकले.

तसेच मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, एम/पश्चिम विभागातील परिरक्षण खात्याच्या अंतर्गत असणा-या फूटपाथ, रस्ते व म्युनिसिपल प्रॉपर्टीवरील असणा-या प्रार्थना स्थळांची संख्या पत्र क्र. ACM/W/720532628/Maint of 14.05.09 अन्वये पाठविलेल्या उत्तरामधील (सी) मध्ये दिली असून, त्यापैकी किती मंदिरे आणि किती मस्जिद यांचेवर कारवाई केली ही माहिती उपलब्ध अभिलेखावरुन अ.क्र. डी मध्ये देण्यात आलेली आहे.

मुळ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती मागील १० वर्षापर्यंतच्या कालावधीमधील असल्याने, सदर माहितीचा कार्यालयीन अभिलेखात शोध घेण्यास खूप वेळ व्यपगत झाला. त्याचप्रमाणे मुळ अर्ज संबंधित खात्याकडे वेळेत प्राप्त झाला नाही. तसेच परिरक्षण विभागाची सेवा ही दररोजच्या नागरी दैनंदिन जीवनाशी संबंधित असल्याने आणि त्या

सेवांवर परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन माहिती देण्याची जबाबदारी पार पाडावी लागते.

तसेच विभाग कार्यकारी अभियंता, एम/पश्चिम विभाग तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे जर अपीलार्थी प्रत्यक्ष एम/पश्चिम विभाग कार्यालयात भेटले असते, तर त्यांना आवश्यक असणारी माहिती देण्यास मदतच झाली असतील.

सबब अपीलार्थीस हवी असलेली माहिती मागील १० वर्षामील असल्याने आणि महानगरपालिकेच्या परिरक्षण विभागाची सेवा ही लोकांच्या दररोजच्या नागरी दैनंदिन व्यवहाराशी संबंधित असल्याने, त्या सेवेवर परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन, लवकरात लवकर उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. यावर अपीलार्थीची आणखी काही सूचना असल्यास त्याप्रमाणे आवश्यक ती या विभागाशी संबंधित माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. "

वरील विवेचनावरुन अपीलार्थीस माहिती देण्यासंबंधी योग्य ते प्रयत्न करण्यांत आलेले आहेत व झालेल्या विलंबाबद्दल जो खुलासा सादर करण्यात आलेला आहे त्यातील बरेच मुद्दे हे विचारात घेण्यासारखे आहेत. प्रथम अपीलात निर्देशिल्याप्रमाणे जर अपीलार्थी अपील सुनावणीच्या वेळेस किंवा त्यानंतरहि कार्यालयात उपस्थित राहू शकले असते तर प्रत्यक्ष चर्चेमध्ये अपीलार्थीस आणखीन चांगल्या रितीने माहिती देण्याच्या दृष्टीने मदत करता आली असती. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ७ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४०३८/अपील क्रमांक ५०५२/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४४०४०/अपील क्रमांक ५०५४/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४४०४१/अपील क्रमांक ५०५५/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४४०४२/अपील क्रमांक ५०५६/०२**

**श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट,**
**डॉ. राजाबली पटेल लेन समोर,**

बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (परिमंडळ६) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
परिमंडळ ६, ३ रा मजला, एन/वार्ड कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई ७७.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (मेंटेनन्स)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
परिमंडळ ६, ३ रा मजला, एन/वार्ड कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई ७७.

२.अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (मेंटेनन्स)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/पूर्व विभाग, १३७, टी.पी.एस ५, रोड नं.२,
प्रभात कॉलनी,सांताक्रुज (पूर्व) मुंबई ५५.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/पूर्व विभाग, १३७, टी.पी.एस ५, रोड नं.२,
प्रभात कॉलनी,सांताक्रुज (पूर्व) मुंबई ५५.

३.अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
ब वार्ड कार्यालय, १२१ रामचंद्र भट्ट मार्ग, बाबुला टँक,
X लेन, जे.जे. हॉस्पीटलसमोर, मुंबई ९.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (मेंटेनन्स)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
ब वार्ड कार्यालय, १२१ रामचंद्र भट्ट मार्ग, बाबुला टँक,

X लेन, जे.जे. हॉस्पीटलसमोर, मुंबई ९.

४.अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/पश्चिम विभाग, सेंट मार्टिन्स रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एच/पश्चिम विभाग, सेंट मार्टिन्स रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४ सप्टेंबर, २००९
सुनावणीची तारीख ५/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बाबतीत केलेली कारवाई याची माहिती पाहिजे होती. ही माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी अंतिमतः आयोगाकडे धाव घेतलेली आहे.

अपीलार्थींचे असे म्हणणे की, कांही वॉर्डाकडून त्यांना व्यवस्थित माहिती मिळालेली आहे तर ती इतर वॉर्डाकडून कां मिळू नये १ तेव्हा अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही ७ दिवसांचे आत देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले.

अपील क्रमांक ५०५२ व ५०५५ यातील जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस अपीलार्थीस हवी असणारी माहिती सोबत आणली होती. ती माहिती अपीलार्थीस देण्याचे संबंधित जन माहिती अधिका-यांना निर्देश देण्यांत आले.

*----आदेश----*

**चारहि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**अपील क्रमांक ५०५४ व ५०५६ मध्ये अपीलार्थीस हवी असणारी माहिती ७ दिवसांचे आंत देण्यांत यावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ७ डिसेंबर, २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/४४०३९/अपील क्रमांक ५०५३/०२

श्री.चेतन कोठारी -----अपीलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन समोर,
बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.प्र.) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,
एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

२. जन माहिती अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
पूर्व उपनगरे, राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,
एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४ सप्टेंबर, २००९
सुनावणीची तारीख ५/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस अनधिकृत धार्मिक स्थळांची बांधकामे व ती काढून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती. अपीलार्थींचा मूळ अर्ज हा महापालिका आयुक्तांच्या कार्यालयाकडे केला होता व त्या कार्यालयाने त्या अर्जाची प्रत इमारत प्रस्ताव कार्यालयाकडे सुध्दा पाठविण्यांत आलेली होती. अशा अनधिकृत इमारतीवरील कारवाई ही वॉर्डाकडून होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात अपीलार्थीस हवी

**असलेली माहितीची कागदपत्रे नाहीत  असे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे.**

**सर्व वॉर्डाच्या जन माहिती अधिका-यांनी  अपीलार्थीस हव्या असलेली माहिती दिलेली आहे व देण्याचे कबूल केलेले आहे.    तेव्हा  या विभागाकडून अपीलार्थीस माहिती देण्याची आवश्यकता नाही.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ७ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८१७/अपील क्रमांक ५०९२/०२**

**श्री.अनिल शांताराम जामगेकर -----अपीलार्थी**
**रा. अशोक धर्मा चाळ, रुम नं. १,**
**गणेशवाडी म्हातारपाडा मार्ग क्र.१,**
**वॉलफोर्ट टॉवर इमारती बाजूला,**
**अंबोली , अंधेरी (पश्चिम) मुंबई - ५८.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ९, हिल रोड, वांद्रे (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५०.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पश्चिम नियंत्रण कक्ष , वांद्रे (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३/१०/२००९**
**सुनावणीची तारीख १६/१२/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांच्या वतीने पुढीलप्रमाणे अहवाल सादर करण्यांत आला.

| अ. क्र | अपीलार्थी यांचा अर्ज व दिनांक इ.तपशिल. | दिलेल्या माहितीबाबतचा तपशिल |
|---|---|---|
| १. | अपीलार्थी यांचा दि.२०/७/०९ (प्राप्त दि.२१/०७/०९) रोजीचा मुळ अर्ज या कार्यालयात प्राप्त झाला होता. | सदर अर्जास अनुसरुन अंबोली पोलीस ठाणेनी माहिती (सहायक पोलीस आयुक्त, दा.नौ.नगर विभाग, मुंबई यांचे मार्फत जा.क्र ९०७/सपोआ/दा.नौ.नगर विभाग/०९, दि ३०/०८/०९ प्रमाणे या कार्यालयास प्राप्त झालेली माहिती)अपीलार्थी यांना या कार्यालयाचा जावक्र क्रमांक ५२५९/सपोआ/माअअ/पनिक/०९ दि. ०३/०९/०९ अन्वये देण्यात आलेली आहे. |
| २. | अपीलार्थी यांना दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान न झालेने त्यांनी मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्या कार्यालयात दि. २५/०८/०९ रोजी अपील अर्ज सादर केला. | अपीलार्थीच्या प्रथम अपील अर्जाबाबत मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयात दि. २२/०९/०९ रोजी सुनावणी घेतली व त्यांनी त्यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक ३३१७/पोउआ/परि-९/माअअ/०९ दि. २४/०९/०९ रोजीच्या आदेशात "अपीलार्थी यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदविलेल्या गु.र.क्र.१५५/२००६ च्या संदर्भात प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागितलेली होती. त्या अनुषंगे सहायक पोलीस आयुक्त व माहिती अधिकारी, पश्चिम नियंत्रण कक्ष, मुंबई यांनी मुळ अर्जातील मुद्दा क्र. ३(१) ते ३(६) बाबत अपीलार्थी यांना समाधानकारक माहिती दिलेली आहे. परंतु मुळ अर्जातील मुद्दा क्र.३(७) बाबत अपीलार्थी यांना समाधानकारक माहिती दिलेली नाही. तसेच मुळ अर्जातील मुद्दा क्र. ३(८) बाबतची माहिती अपीलार्थी यांना दिलेली नाही. यास्तव सहायक पोलीस आयुक्त व माहिती अधिकारी, पश्चिम नियंत्रण कक्ष, बांद्रा (पश्चिम)मुंबई यांनी मुळ अर्जातील मुद्दा क्र. ३(७) व ३(८) बाबत सुधारित उत्तर अपीलार्थी यांना द्यावे. " असे नमूद केलेले आहे.<br>वरीलप्रमाणे मा. प्रथम अपिलीय अधिकारी, बांद्रा (पश्चिम) मुंबई यांच्या कार्यालयात झालेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशास अनुसरुन नमूद मुद्दयांवरील माहिती अपीलार्थी यांना विनाविलंब द्यावयाची असल्याने मुद्देसुद सविस्तर माहिती ३ दिवसाचे आत या कार्यालयात सादर करणेबाबत वरिष्ठ |

| | | |
|---|---|---|
| | | पोलीस निरीक्षक, अंबोली पोलीस ठाणे, मुंबई यांना या कार्यालयाकडून जा.क्र.५८१०/सपोआ/माअअ/पनिक/०९ दिनांक ०५/१०/०९ प्रमाणे कळविण्यात आले होते. (ओशिवरा पो.ठाणेने संबंधित कागदपत्र अंबोली पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले तात्कालीन पोलीस निरीक्षक श्री. गिरी यांचेकडे तपासा करीता असलेचे नमूद केलेने संबंधित माहिती या कार्यालयास पाठविणेकरीता वपोनि,अंबोली पोलीस ठाणे यांना कळविण्यात आले होते. ) परंतु सदरहू माहिती अद्यापही अंबोली पो. ठाणेकडून या कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याने ती अपीलार्थी यांना देता आलेली नाही. |
| ३ | अपीलार्थी यांनी मा. मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जाबाबत. | सदरहू माहिती नमूद अपीलार्थी यांना न मिळाल्यामुळे त्यांनी दि. २३/१०/०९ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांच्या कार्यालयास द्वितीय अपील अर्ज सादर केलेला आहे.<br>सदरहू द्वितीय अपील अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे मुद्देनिहाय खुलासा वजा माहिती अहवाल तयार करुन दि. १४/१२/०९ रोजी १२-३० वाजता या कार्यालयात संबंधित अधिकारी यांचे सोबत घेऊन हजर राहणेबाबत या कार्यालयाकडून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ओशिवरा व अंबोली पोलीस ठाणे, मुंबई यांना जा.क्र. ६८००/सपोआ/माअअ/पनिक/०९ दिनांक ०७/१२/०९ अन्वयेच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतु त्या दोन्ही पोलीस ठाणे कडून खुलासा अहवाल या कार्यालयास आज कार्यालयीन वेळेपर्यंत प्राप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांचे खुलासे आपणांस सादर करता आलेले नाहीत.<br>यामध्ये नमूद पोलीस ठाणेकडून योग्य तो प्रतिसाद दिलेला नसल्याने यातील अपीलार्थी यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे उर्वरित माहिती देता आलेली नाही. त्यावरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंबोली पोलीस ठाणे व ओशिवरा पोलीस ठाणे यांचेबाबतीत योग्य ते आदेश व्हावेत ही विनंती. |

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त यांनी आदेश देऊनहि व आयोगाकडे सुनावणी लागल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, वरिष्ठ पोलीस

निरीक्षक ओशिवरा व अंबोली पोलीस ठाणे यांना, त्यांच्या दि. ७/१२/२००९ रोजीच्या पत्राने कळवून सुध्दा ते उपस्थित राहिलेले नाहीत व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे सुध्दा पालन झालेले नाही. तसेच अपीलार्थीस माहिति सुध्दा देण्यांत आलेली नाही.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक ओशिवरा व अंबोली पोलीस ठाणे यापैकी माहिती देण्यासाठी दोघेही जबाबदार असतील तर दोघांनाहि प्रत्येकी रु. ५,०००/- किंवा पोलीस उपआयुक्त ही माहिती देण्यासाठी ओशिवरा किंवा अंबोली पोलीस ठाणे यापैकी एकच अधिकारी जबाबदार आहे असे ठरवित असतील तर फक्त त्या अधिका-यावर रु.५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती संबंधित पोलीस उप आयुक्त यांनी संबंधित अधिकारी यांच्या दि. १ फेब्रूवारी, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल व चलनाची प्रत आयोगास दि. १५ फेब्रूवारी, २०१० रोजी पर्यंत पाठविण्यात यावी. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी संबंधित पोलीस ठाणेकडून माहिती मिळवून घेऊन अपीलार्थीस ७ दिवसांचे आत देण्यांत यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १६ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८१५/अपील क्रमांक ५०९३/०२

श्री. रामन बी. जायभावे -----अपीलार्थी
.सार्वजनिक बांधकाम विभागाजवळ,
शिवडी फास्ट ट्रॅक कोर्टसमोर, झकेरीया बंदर रोड,
शिवडी, मुंबई ४०० ०१५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी
उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक २३/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, टाटा कॉलनी को.ऑप.हौसिंग सोसायटी ही ७ सोसायटयांचे रजिस्ट्रेशन रद्द करुन दि. १५/१२/२००५ रोजीच्या एकत्रिकरणाच्या आदेशानुसार निर्माण झालेली दिसते त्याबाबतच्या कागदपत्रांची माहिती अपीलार्थी यांनी मागितली असता ती नस्ती सापडून येत नाही म्हणून ती देता येत नाही असे अपीलार्थीस कळविण्यांत आलेले आहे.

याबाबत नस्तीचा जारीने शोध घ्यावा व अपीलार्थीस हवी असणारी माहिती १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश देण्यांत आले.

जर नस्ती सापडूनच येत नाही असे निष्पन्न होत असेल तर संबंधित पार्टिजकडून कागदपत्रे घेऊन नस्ती रि-कंन्स्ट्रक्ट करण्यात यावी व अपीलार्थीस माहिती देण्यांत यावी.

**तसेच नस्ती उपलब्ध न झाल्यास नस्ती सांभाळण्याची जबाबदारी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांची असेल त्यांच्या विरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.**

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक १६ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८१४/अपील क्रमांक ५०९४/०२

श्रीमती आनंदी रामचंद्रन -----अपीलार्थी
इमारत २९/अ-२२, तक्षिला
दुसरा मजला, महाकाली केव्हज रोड,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०९३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था,
के/ इस्ट वॉर्ड , रुम नं. ६९,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था
के/ इस्ट वॉर्ड , रुम नं. ६९,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २०/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थींच्या अपीलासंबंधी पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे.

"श्रीमती आनंदी रामचंद्रन यांनी या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज दाखल करुन संस्थेच्या कामकाजाबाबत प्रश्नावली स्वरुपात माहिती मागितली होती. या कार्यालयाने सदर अर्जाबाबत दिनांक २९/०७/२००९ रोजी अर्जदार यांना लेखी उत्तर/पत्र दिलेले आहे. सदर पत्रात त्यांना कळविण्यांत आले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कागदोपत्री उपलब्ध असलेली माहिती देता येते. परंतु त्यांनी मागितलेली माहिती प्रश्नावली स्वरुपातील असून ती देता येत नाही. म्हणून त्यांनी सदर बाबतीत संस्थेवर नियुक्त केलेल्या प्रशासक मंडळाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच या कार्यालयात सदर संस्थेबाबत उपलब्ध असलेल्या धारिकेची पाहणी करुन त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात. परंतु अर्जदार यांनी या कार्यालयाशी अद्याप संपर्क साधलेला नाही.

तसेच या कार्यालयाने वरीलप्रमाणे दिलेल्या उत्तराबाबत अर्जदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५/०८/३००९ रोजी अपील दाखल केले होते. सदर अपीलावर दि. १६/०९/२००९ रोजी सुनावणी घेऊन दि. ०३/१०/२००९ रोजी दिलेल्या आदेशात या कार्यालयाने दि. २९/०८/२००९ रोजी अर्जदारास दिलेले उत्तर बरोबर आहे, असे नमूद करुन त्यांचे अपील निकाली काढलेले आहे. "

अपीलार्थीनी जरी माहिती मिळण्यासाठी प्रश्नावली सादर केली असली तरी प्रश्नावळीचा रोख लक्षात घेऊन त्यासंबंधीची जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्याच्या प्रती देणे हे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

<u>*----आदेश---*</u>

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

अपीलार्थीना हवे तर त्यांनी रेकॉर्डची तपासणीहि करुन घ्यावी.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १६ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८०८/अपील क्रमांक ५०९९/०२

श्री. प्रविण हिरबा दळवी -----अपीलार्थी
परेल शिवसंदेश को.ऑप.हौ.सोसायटी,
इमारत क्र.१, रुम नं. १०६, कस्तुरबा गांधीनगर,
वरळी, मुंबई ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,

वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १४/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी यांनी आयोगास पत्र लिहून त्यांना हवी असलेली सर्व माहिती मिळाली असल्यामुळे त्यांनी दाखल केलेले अपील ते परत घेत आहेत असे कळविले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १६ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८१३/अपील क्रमांक ५०९५/०२

श्री.संजय शिर्के -----अपीलार्थी
५४, रिज रोड, शिवा सदन,
मलबार हिल, मुंबई ४०० ००६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
डी विभाग यांचे कार्यालय, जोबनपूत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई ०७.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
अथवा शिक्षणाधिकारी
डी विभाग यांचे कार्यालय, जोबनपूत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई ०७.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २८/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी ज्या शाळेच्या बांधकामासंबंधी माहिती मागितली होती ती माहिती देण्यांत आलेली आहे. मात्र शाळेच्या उद्‌घाटनासंबंधीची माहिती शिक्षणाधिकारी खात्याच्या जनसंपर्क अधिकारी यांनी अजूनहि अपीलार्थीस दिलेली नाही असे सुनावणीच्या वेळेस दिसून आले.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी त्या विभागास स्मरण करुन देऊन माहिती असल्यास ती पाठविण्यात यावी व कुठचीही कागदपत्रे नसल्यास तसे कळविण्याचे निर्देश देण्यांत आले.

अपीलार्थींना शाळेचा वापर भाडेतत्वावर करण्यासंबंधी विभागाचे जे धोरण असेल त्याची प्रत विनाशुल्क उदया दि.१७/१२/२००९ रोजी दुपारी १२-०० वाजता देण्याचे निर्देश देण्यांत आले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १६ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती
आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८१८/अपील क्रमांक ५०९१/०२**

**श्रीमती परविन अब्दुल कादर शेख -----अपीलार्थी**
**द्वारा- ॲड्व्होकेट सईदा शेख**
**एम.एच.बी. कॉलनी, डी.जी.नगर**

१२६/१०१३, गेट नं.७, मालवणी,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०९५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२.जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष
मालवणी फुलंगी सह.गृहनिर्माण संस्था,
म्हाडा लेआऊट, मालवणी, मालाड (प) मुंबई ९५.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २०/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस प्रथम अपीलावर दि. १४/१२/२००९ रोजी सुनावणी लावण्यात आली होती व सुनावणीचा आदेश एका आठवडयाच्या आत काढले जातील त्यामुळे अपीलार्थींनी आधी ते आदेश पहावेत, त्याने त्यांचे समाधान झाले तर उत्तमच नाही तर आयोगाकडे पुन्हा अपील करण्यास हरकत नाही. ते अपील आयोगातर्फे प्राधान्याने सुनावणीसाठी घेण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय न दिल्याबद्दल त्यांना सक्त ताकीद देण्यांत येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १६ डिसेंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८०६/अपील क्रमांक ५१०१/०२**

**श्री. ऑलविन रिबेरो -----अपीलार्थी**
**३४/१२, शंकर नगर, वडाळा,**
**मुंबई ४०० ०३१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी**
**तहसिल कार्यालय अंधेरी, दादाभाई रोड,**
**नवरंग टॉकीज पुढे, अंधेरी (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५८.**

**२.जन माहिती अधिकारी**
**तहसिल कार्यालय अंधेरी, दादाभाई रोड,**
**नवरंग टॉकीज पुढे, अंधेरी (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०५८.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १४/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या दि. १०/७/२००९ रोजीच्या अर्जाने जी माहिती पाहिजे होती ती तयार आहे व शुल्क भरुन घेऊन जाण्याचे दि. २९/९/२००९ रोजीच्या पत्राने विनंती करण्यांत आलेली आहे.

अपीलार्थीच्या अर्जाबाबत त्वरित कार्यवाही न करण्याचे कारण लोकसभा व नंतर विधानसभा निवडणूकांमध्ये कर्मचारी व्यस्त होते त्यामुळे अपीलार्थींना मुदतीत कळविता आले नाही असा जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला. जन माहिती अधिका-याचे हे जरी म्हणणे मान्य करण्यांत आले असले तरी अपीलार्थीस मुदतीत माहितीच्या बाबतीत न कळविल्यामुळे अपीलार्थीस हवी असलेली माहिती ५ दिवसांचे आंत विनामूल्य पोष्टाने पाठविण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १७ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती

आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८११/अपील क्रमांक ५०९७/०२**

**श्री. प्रशांत बाबूराव हाटे -----अपीलार्थी**
**दोन टाकी पोलीस लाईन, मौलाना शौकत अली मार्ग,**
**मुंबई ४०० ००३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (प्रशा) ----उत्तरवादी**
**वित्त विभाग (प्रशा-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**वित्त विभाग (प्रशा-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २९/१०/२००९
सुनावणीची तारीख १६/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

"१. श्री. प्रशांत बाबुराव हाटे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत, राज्य जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांच्याकडे दि. ८/८/२००९ नुसार सादर केलेल्या अर्जान्९ये मंत्रालयातील कोणत्याही पाच निरनिराळया विभागातील १३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या वर्ग तीन कर्मचारी यांना मिळालेल्या वेतन देयकांच्या प्रती मिळण्याबाबत विनंती केली होती. तथापि, श्री.हाटे यांनी मागितलेली माहिती मंत्रालयातील कोणत्याही एका विभागाकडे एकत्रित स्वरुपात उपलब्ध नसून ती विभागनिहाय उपलब्ध असते त्याकरिता मंत्रालयाच्या संबंधित विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. वर्ग तीन मध्ये लिपिक, लिपिक-टंकलेखक, वाहनचालक, सहायक, लघुलेखक इत्यादी संवर्ग येतात व अर्जदारांना कोणत्या संवर्गातील कोणत्या विशिष्ट कर्मचा-यांच्या वेतन देयकाच्या (Pay Slips) प्रती आवश्यक आहेत याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही. त्याचप्रमाणे अर्जामध्ये विशिष्ट कर्मचा-यांच्या नावाचा उल्लेख नसल्यामुळे कलम ११(१)खालील कार्यवाही करण्यात देखिल अडचण असल्याने अर्जदारांच्या मागणीचा विचार करता येणे शक्य नाही असे दिनांक १७/०८/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे.

२. उक्त नमूद उत्तराच्या अनुषंगाने श्री.हाटे यांनी दिनांक २३/०८/२००९ अन्वये अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (प्रशासन) यांच्याकडे अपील सादर केले. सदर अपीलावरील सुनावणीकरीता दिनांक १६/९/२००९ रोजी सकाळी ११-३० वाजता उपस्थित राहण्याविषयी श्री.हाटे यांना दि. ९/९/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि श्री.हाटे सुनावणीकरीता उपस्थित राहिले नसल्याने तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर सुसंगत असल्याने त्यांचे अपील फेटाळण्यात येत असल्याबाबत दिनांक २३/९/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. ३. तद्नंतर श्री.हाटे यांना

अपीलावरील निर्णयाची प्रत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९/९/२००९ रोजी व्यक्तिशः अपिलीय प्राधिकारी यांची भेट घेतली असता त्यांना निर्णयाची प्रत देण्यात आली.

४. श्री. हाटे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दिनांक ८/८/२००९ चा अर्ज तसेच दिनांक २३/८/२००९ च्या अपील अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली आहे. "

अपीलार्थींनी त्यांच्या अर्जात त्यांना माहिती का हवी आहे याचे प्रयोजनहि दिलेले आहे. (प्रत्यक्षात तशी आवश्यकता नाही.) ते लक्षात घेता अपीलार्थींना वर्ग तीन मधल्या कोणत्या संवर्गातील वेतन देयकाच्या (Pay Slips) प्रती पाहिजे आहेत ते स्पष्ट करुन त्यांना ज्या विभागातील कर्मचा-यांच्या (Pay Slips) पाहिजे आहेत त्यांच्याकडे सरळ वेगळा अर्ज करणे हेच त्यांची माहितीची गरज भागविण्याच्या दृष्टीने जास्त योग्य राहिल. अपीलार्थी सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांची याबाबत कोणतीही भूमिका समजून घेता आली नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १७ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/३४३४५/तक्रार क्रमांक ६३०/०१

श्री. आर माधवदास -----तक्रारदार
रुम नं. ६-अे, पहिला मजला,
कल्याण भवन, ३५४ कालबादेवी रोड,
मुंबई - ४०० ००२.

विरुध्द

**१. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, आर वार्ड, मलहोत्रा हाऊस,**
**जी.पी.ओ जवळ,मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**तक्रारदारांच्या दि. ११/१०/२००७ रोजीच्या अर्जास दि. २३/१०/२००७ रोजी उत्तर देण्यांत आलेले आहे. तक्रारदारांस , श्रीमती. अनिता जे. मुलचंदानी यांनी दि. ७/९/२००७ रोजी जी तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती पाहिजे होती.**

**तक्रारदारांस याबाबतीत संस्थेचा खुलासा प्राप्त झाला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे असे कळविण्यांत आले होते. मात्र तक्रारदारांचा अर्ज श्रीयुत आर माधवदास यांचा असतांना पत्र मात्र ज्यांनी तक्रार केली होती त्यांना ते पाठविण्यांत आले आहे. अर्ज श्रीयुत माधवदास यांनी केला असल्यामुळे तो जरी श्रीमती अनिता मुलचंदानी यांनी केलेल्या तक्रारीसंबंधी असला तरी त्यांच्या अर्जास अनुसरुन त्यांना माहिती देणे आवश्यक होते. त्यामुळे उत्तर देतांना अतिशय सतर्क राहण्याची ताकीद जन माहिती अधिकारी यांना देण्यांत येत आहे.**

**तसेच माहिती देता असतांना प्रथम अपिलीय अधिकारी कोण आहेत ते व त्यांचा पत्ता याचीहि माहिती अर्जदारास देणे आवश्यक आहे.**

***---आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक १७ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/४४७३१/अपील क्रमांक

५०८८/०२

श्रीमती संध्या शिरीष शानभाग -----अपीलार्थी
१२७-अ/ ४४५८ & ३३६६, जीवनदीप,
टिळकनगर, चेंबूर, मुंबई ४०० ०८९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार ----उत्तरवादी
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरशी रोड, मुंबई ४०० ०२०.

२.जन माहिती अधिकारी
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरशी रोड, मुंबई ४०० ०२०.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक २१/१०/२००९
सुनावणीची तारीख १७/१२/२००९
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीचे प्रथम अपील दि. ९ ऑक्टोबर, २००९ रोजीच्या आदेशाने मेंन्टेनेबल नाही असे अपीलार्थीस कळविलेले आले. यास कारण देतांना अर्ज हा श्री. शिरीष शानबाग यांनी दिलेला आहे व अपील हे संध्या शानबाग यांनी केलेले आहे असे दर्शविलेले आहे.

कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपीलार्थीचा दि. १२/८/२००८ रोजीचा अर्ज हा एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाकडे दि. १८/८/२००९ रोजी

प्राप्त झाला. तसेच त्याच नांवाने दि. १८/९/२००९ चे अपील दिलेले आहे जे त्याच दिवशी विद्यापीठाकडे प्राप्त झालेले आहे. अशा परिस्थितीत या अपीलात अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी कांहीही माहिती दिलेली नाही असे लिहिलेले आहे. तेव्हा आयोगापुढील अपील हे प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ यांच्याकडे पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय देण्यासाठी पाठविण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार यांनी एका महिन्याच्या आत सुनावणी घेऊन अपीलावर निर्णय द्यावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १७ डिसेंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४७३४/अपील क्रमांक ५०९०/०२

श्री.घनःश्याम पु. टांक -----अपीलार्थी
फ्लॅट नं. १२, २ रा मजला,
श्री. जयसुख को.ऑप.हौ.सो.लि.
लिबर्टी गार्डन रोड नं.३, आय.सी.आय.सी.आय बँकेसमोर,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.प्र.) ----उत्तरवादी
इमारत प्रस्ताव विभाग (पश्चिम उपनगरे) यांचे कार्यालय,
१ ला मजला, आर.के. पालकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
इमारत प्रस्ताव विभाग (पश्चिम उपनगरे) यांचे कार्यालय,
१ ला मजला, आर.के. पालकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २१/१०/२००९

**सुनावणीची तारीख १७/१२/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस सि.टी.एस. सर्व्हे नं. ६५७ ,टी.पी.एस.III खार (पश्चिम) मधील भूखंडासंबंधात माहिती पाहिजे होती. सदरील विषयासंदर्भात दोन फाईल्स असून एक फाईल जी उपलब्ध होती ती अपीलार्थीस दाखविण्यात आलेली आहे व अपीलार्थीस आवश्यक त्या प्रती त्यांनी प्राप्त करुन घेतलेल्या आहेत. मात्र दुसरी फाईल मिळून येत नाही असेच जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला सुध्दा निष्पन्न झाले.**

**सुनावणीच्या वेळेस अपीलार्थींनी असे सांगितले की, सदर मालमत्तेच्या बाबतीत त्यांच्या सावत्र भावाला कांही कॉम्पेन्सेशन देण्यांत आलेले आहे त्यासंदर्भातले अपीलार्थींकडे असलेले पेपर्स त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दाखवावेत, जेणेकरुन इतर कुठच्या विभागाकडे यासंदर्भात माहिती सापडू शकते काय याबाबत क्लू मिळू शकेल, व त्या विभागात चौकशी करुन अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी करावा. यास अपीलार्थी यांनी संमती दर्शविली. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक १७ डिसेंबर, २००९**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८८९/अपील क्रमांक ५०८४

अ/०२

श्री.अजय मधुसुदन मराठे ----- 
अपीलार्थी
५०४, न्यू सर्वोदया को.ऑप.हौ.सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट नं. २९ ब, वाशी,
नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक ----उत्तरवादी
देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय,
गोवंडी रेल्वे स्टेशन समोर, गोवंडी, मुंबई ४०० ०४३.

२.जन माहिती अधिकारी
देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय,

गोवंडी रेल्वे स्टेशन समोर, गोवंडी, मुंबई ४०० ०४३.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक २९/१०/२००९
सुनावणीची तारीख १७/१२/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी ई-मेल पाठवून आयोगास असे कळविले आहे की, त्यांना माहिती मिळालेली आहे त्यामुळे सद्य:परिस्थितीत अपील हे रद्द समजण्यात यावे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४७३०/अपील क्रमांक ५०८९/०२

श्री. केतन काराभाई सोळंकी -----अपीलार्थी
देवकाभाई चाळ, नित्यानंदनगर, जे.पी.रोड,
सिध्द गणेश मंदिराजवळ, घाटकोपर (पश्चिम)
मुंबई ४०० ०८६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एन वार्ड, ३ रा मजला, जवाहर रोड,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७७.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (मेटेनन्स)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
एन वार्ड, ३ रा मजला, जवाहर रोड,
घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७७.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २१/१०/२००९
सुनावणीची तारीख १७/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस जे.पी. रोड, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड जोडरस्ता येथील रस्ता रुंदीकरणाच्या बाधीत बांधकामासंबंधीची माहिती त्यांच्या दि. ३ जून, २००९ रोजीच्या अर्जाने पाहिजे होती.

अपीलार्थीस असे कळविण्यांत आले आहे की, ज्या बाधीत व्यक्तींच्या बाबतीत अजूनहि क्लेम्सची कागदपत्रे गोळा करणे व त्यांची छाननी करणे वगैरे प्रक्रिया चालू आहे व अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. मात्र याबाबतीत अस्थायी स्वरुपाचे रजिस्टर कार्यालयाने तयार केलेले आहे व त्याची तपासणी अपीलार्थींना करता येईल. त्याप्रमाणे अपीलार्थी यांनी तशी तपासणी करुन घेतलेली आहे.

सदरील प्रकरणामध्ये रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये बाधीत व्यक्तींच्या प्रक्रिया व्यवस्थासाठीची पात्र-अपात्रता याबाबतीत अजूनहि कुठचाहि अंतिम निर्णय झालेला नाही.

कागदपत्रांची छाननी अद्यापहि चालू आहे. अशा परिस्थितीत इतर २००-२५० व्यक्तींची कागदपत्रे या घटकेला अपीलार्थीस देण्याच्या बाबतीत मोठया प्रमाणावर तृतिय पक्षीयांच्या ना-हरकतीविषयी कळविणे हे अव्यवहार्य आहे, व सध्या कुठचाहि निर्णय घेतला नसल्यामुळे ते आवश्यक सुध्दा नाही. प्रकरण अद्याप प्रोसेसमध्ये आहे, पात्रता-अपात्रता ठरविणे ही बाब अर्धन्यायिक स्वरुपाची असते व त्यात अपीलाची सुध्दा तरतुद आहे. असे जरी असले तरी अपीलार्थींना संपूर्ण कागदपत्रे दाखविण्यांत आलेली आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो.

एक गोष्ट मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पाठविलेल्या पत्रात बॉम्बे हायकोर्ट (माहितीचा अधिकार)नियम २००६ प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीचा उल्लेख केलेला आहे तो अनाठायी आहे. सदरील नियम हे हायकोर्टात दाखल केलेल्या माहितीच्या अर्जासाठीच लागू आहे. इतर बाबतीत महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे याची जन माहिती अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४५०८५/अपील क्रमांक ५०८६/०२**

**श्री. संजराज हरिश्चंद्र मंगेशकर -----अपीलार्थी**
**द्वारा- महेश काशिनाथ सुर्वे,**
**८२/एफ, स्नेहा को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**ब्लॉक नं. २, ठाकूरवाडी, दादर (पूर्व)**
**मुंबई -- ४०० ०१४.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा महासंचालक ----उत्तरवादी**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,**
**१ ला मजला, मधू इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१३.**

**२.जन माहिती अधिकारी**
**लाचलुचपत प्रतिबंध विभाग,**
**१ ला मजला, मधू इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१३.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ७/११/२००९
सुनावणीची तारीख १७/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

असे दिसते की, अपीलार्थीनी उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्रमांक १८४५/०९ दाखल केलेले आहे. त्यासंदर्भात असलेल्या तक्रारीत कांही जाबजबाब व कागदपत्रे पुरावे म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभागास सादर केलेले आहेत त्याबाबतीत झ ाालेल्या कारवाईची माहिती ११ मुद्दयांअंतर्गत अपीलार्थीस पाहिजे आहे.

अपीलार्थीच्या दि. २९/१०/२००९ रोजीच्या अर्जास दि. ५/११/२००९ रोजी ११ मुद्दयांवर उत्तर दिलेले आहे त्याचा सार असा दिसतो की, संबंधित प्रकरणामध्ये सध्या प्राथमिक चौकशी चालू आहे, त्यामुळे अपीलार्थीनी जी अनेक गृहितके (Assumption)धरुन जे ११ प्रश्न विचारलेले आहेत त्यापैकी कुठच्याहि बाबतीत आज माहिती देण्यासारखी परिस्थिती नाही. कारण चौकशी ही प्राथमिक अवस्थेत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलार्थीनी दाखल केलेले अपील फेटाळलेले आहे. जर प्रकरणाची चौकशीच प्राथमिक अवस्थेत आहे त्याअर्थी अटकपूर्व जामीन, गुन्हा दाखल करणे वगैरे बाबतीत आजघटकेला देण्यासारखी कुठचीही माहिती नाही हे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे सद्य:परिस्थितीत मान्य करण्यात येत आहे.

<u>*----आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८९२/अपील क्रमांक ५०८७ अ/०२**

**श्री. मोईन अख्तर कुरेशी -----अपीलार्थी**
**५८३, तळमजला, जे.एस.एस.रोड,**
**चिरा बाजार, मुंबई ४०० ००२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**सी वार्ड कार्यालय, चंदनवाडी,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई ४०० ००२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**सी वार्ड कार्यालय, चंदनवाडी,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई ४०० ००२.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३०/१०/२००९

**सुनावणीची तारीख  १७/१२/२००९**
**अपीलार्थी व  जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी त्यांच्या दि.  ७ जुलै, २००९ रोजीच्या अर्जाने सन २००८-०९ सालच्या शो-एव्हिडन्स रजिस्टरच्या प्रतींची मागणी केली होती.   त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे कुठचेहि रजिस्टर ठेवल्या जात नाही  असे अपीलार्थींस कळविले आहे, व प्रथम अपीलात सुध्दा हाच निर्णय कायम करण्यांत आला आहे.**

**सुनावणीच्या वेळेला  जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा प्रतिपादन केले की, अशा प्रकारचे कुठचेहि रजिस्टर ठेवल्या जात नाही.   अपीलार्थी सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे हे समजून घेता आले नाही.   त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश---***

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक १८ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८९३/अपील क्रमांक ५०८६
अ/०२

श्री. संदेश पांडूरंग घोडके -----अपीलार्थी
९७/१, बी.डी.डी. चाळ, वरळी,
मुंबई ङ ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक स.संस्था ----
उत्तरवादी
जिल्हा उपनिबंधक स.संस्था मुंबई १ यांचे कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक स.संस्था
जी/एस विभाग.
जिल्हा उपनिबंधक स.संस्था मुंबई १ यांचे कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३०/१०/२००९
सुनावणीची तारीख १७/१२/२००९
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थीस शिववैभव मध्यवर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था बांद्रा या संस्थेकडून माहिती पाहिजे होती व त्यासाठी त्यांनी उपनिबंधक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. मात्र मागितलेली माहिती ही सहकारी संस्था पातळीवरची असल्यामुळे अपीलार्थींनी त्यांच्याकडूनच माहिती घ्यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांनी दिले व संस्थेलाहि माहिती देण्यासंबंधी निर्देश दिले.

संस्थेचे म्हणणे असे की, संस्थेने त्यांच्याकडे असलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांचेमार्फत अपीलार्थीस दिली. मात्र संस्थेला कुठच्याहि प्रकारे शासन अर्थसहाय्य देत नाही व नुकतेच हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार व सहकार आयुक्तांच्या आदेशानुसार ही संस्था "जन प्राधिकरण" या संज्ञेत येत नाही. असे जरी असले तरी संस्थेने एक सद्‌भाव (Courtesty) म्हणून माहिती दिलेली आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ डिसेंबर, २००९
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८९०/अपील क्रमांक ५०८५ अ/०२**

**श्री. नूर मोहम्मद हाजी सोलंकी ----- अपीलार्थी**
**आझाद हिंद इत्तेहादूल मुस्लीमीन ट्रस्ट सेक्रेटरी,**
**रुम नं. १, कुबुबुद्दीन चाळ, अपना नगर,**

आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/नि) ---- उत्तरवादी

उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी,
रुस्तमजी कॉम्प्लेक्स, मनपा मंडई इमारत,
तळमजला, जयवंत सावंत रोड, दहिसर (पश्चिम)
मुंबई ४०० ०६८.

२.जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी,
रुस्तमजी कॉम्प्लेक्स, मनपा मंडई इमारत,
तळमजला, जयवंत सावंत रोड, दहिसर (पश्चिम)
मुंबई ४०० ०६८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३०/१०/२००९
सुनावणीची तारीख १७/१२/२००९
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. २४/६/२००९ रोजी अशी तक्रार केली होती की, दि. २६/४/२००९ रोजी सरकारी जमिनीवरील जमीनदोस्त केलेले अनधिकृत बांधकाम पुन्हा उभारले गेल्याबद्दल तक्रार केली

होती त्यावर कोणती कारवाई झाली याबाबतची माहिती पाहिजे होती.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी त्यासंबंधीची नस्ती अपीलार्थीनी पहावी व त्यांना आवश्यक ती कागदपत्रे देण्यांत यावीत असे निर्देश दिले. त्याप्रमाणे अपीलार्थीनी नस्तीची

पाहणी केलेली आहे.   पण अपीलार्थींचे समाधान हे त्यांच्या तक्रारीवर प्रत्यक्ष कारवाई होण्यानेच होणार आहे.

कारवाई पूर्ण झाल्यानंतर अपीलार्थीस माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.   तरी त्याप्रमाणे अपीलार्थीस कारवाई पूर्ण झाल्यानंतर माहिती देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ डिसेंबर, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४८८७/अपील क्रमांक ५०८३ अ/०२**

**श्री. भिमराव पांडूरंग पवार -----अपीलार्थी**
**१४२/ ४८२६, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व)**
**मुंबई ४०० ०२४.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक (आस्था) ----उत्तरवादी**
**पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई.**

**२.जन माहिती अधिकारी**
**पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ३१/१०/२००९**
**सुनावणीची तारीख १७/१२/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

अपीलार्थी हे पोलीस उपनिरीक्षक आहेत. त्यांना सहायक पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती मिळण्यासंबंधीची माहिती पाहिजे होती. याबाबत अपीलार्थीस पुढीलप्रमाणे माहिती देण्यांत आलेली आहे.

" उपरोक्त संदर्भाधिन अर्जास अनुसरुन कळविण्यात येते की, ज्येष्ठतेनुसार आपल्या नावाचा सपोनि पदावर पदोन्नतीसाठी प्रथमतः सन २००७ च्या निवडसूचीवर विचार करण्यात आला होता. त्यावेळी आपण निलंबित असल्याने निवडसमितीने त्यांना "अपात्र" ठरविले होते. त्यामुळे आपला सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीसाठी विचार झाला नाही.

सन २००३ मध्ये विशेष शाखा-२ येथे नेमणूकीस आतांना, आपणाविरुध्द सहार पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र.३५३/२००३ असा गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणी आपणास निलंबित करण्यात आले होते.

उपरोक्त गुन्हयात मा.महानगर दंडाधिकारी, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांनी उपरोक्त गुन्हयात संदर्भात दिनांक ३/३/२००८ रोजी पोउपनि पवार यांची निर्दोष मुक्तता केली असल्याने, पो.आ.मुंबई यांनी त्यांचे आदेश दिनांक १६/७/२००८ त्यांना दिलेली शिक्षा रद्द करुन त्यांचा २०/९/२००३ ते १७/११/२००७ पर्यंतचा निलंबन कालावधी सवार्थाने कर्तव्यकाळ म्हणून गणण्याबाबतचे आदेश दि. १६/७/२००८ रोजी निर्गमित केले आहेत.

वरील सर्व बाबींचा विचार करुन आपले सपोनि पदावरील पदोन्नतीचे प्रकरण सन २००७ च्या निवडसूचीवर पात्र-अपात्रता अजमाविण्यासाठी फिरत्या (Circulation) पध्दतीने सादर करण्यात आलेले आहेत. अंतिम निर्णय होताच पदोन्नतीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल."

अपीलार्थीच्या प्रकरणाची सद्य:स्थिती त्यात दर्शविलेली दिसते. अपीलार्थीच्या अर्जास मुदतीत उत्तर द्यायला पाहिजे होते. यापुढे असे होणार नाही याची जन माहिती अधिकारी यांनी जाणीव ठेवावी.

---आदेश---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १८ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९००/अपील क्रमांक ५१०८/०२

श्री. के.एम. मामनिया -----अपीलार्थी
७, पटेल निवास, प्लॉट नं. ८,
जूने मानेकलाल इस्टेट, घाटकोपर (पश्चिम)
मुंबई ४०० ०८६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२.जन माहिती अधिकारी

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २६/१०/२००९
सुनावणीची तारीख १८/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस "मिडास टॉवर" या एस.आर.ए. स्कीम मधील सेल पोर्शनमध्ये बांधण्यात आलेल्या इमारती संदर्भात माहिती पाहिजे होती. त्यांना समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे अंतिमतः त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिका-यांनी या बिल्डींगच्या संदर्भातील संपूर्ण माहिती विषद केली व अपीलार्थीस दि. २६/११/०८, २०/५/०९, ६/७/०९, २१/७/०९, व ४/१२/०९ रोजी दिलेल्या माहितीच्या प्रतीही आयोगास सादर केल्या. सदरील केसमध्ये चालू असलेल्या हायकोर्ट प्रोसिडींगची सुध्दा माहिती देण्यांत आली.

अपीलार्थीचा मुळ अर्ज हा दि. १२/११/०८ चा आहे व या विषयातील कांही आदेशही सप्टेंबर २००९ चे आहेत ते सुध्दा अपीलार्थीस देण्यांत आलेले आहेत.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी सोमवार दि. २१/१२/२००९ रोजी जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जातील व त्यांना संपूर्ण नस्ती दाखवून त्यांना या अगोदर दिलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त ज्या कांही कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्याहि त्यांना देण्यांत याव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १८ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९०४/अपील क्रमांक
५१११/०२

श्री. प्रकाश जयसिंग सोनमळे -----अपीलार्थी
१३८/४०९४, कन्नमवार नगर-२,
विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २६/१०/२००९
सुनावणीची तारीख १८/१२/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अंतर्गत येणारी विविध कार्यालयांची माहिती पाहिजे होती. ही माहिती वेबसाईटवर आहे असे त्यांना कळविण्यांत आलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीनी वेबसाईट बघून माहिती प्राप्त करुन घेण्याचे मान्य केले. सदरील वेबसाईट ही चालू स्थितीत आहे व ती उघडते याची ग्वाही जन माहिती अधिकारी यांनी दिली.

वेबसाईट उघडून पाहिल्यानंतर आणखीन मुद्दयांवर माहिती पाहिजे असल्यास जन माहिती
अधिका-यांना तसे कळविल्यास सत्वर माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी सांगितले.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १९ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९०५/अपील क्रमांक

५११२/०२

श्री. प्रकाश जयसिंग सोनमळे -----अपीलार्थी
१३८/४०९४, कन्नमवार नगर-२,
विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, एस वार्ड विभाग इमारत,
लालबहादुर शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,
भांडूप (पश्चिम) मुंबई ४०० ०७८.

२.जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय, एस वार्ड विभाग इमारत,
लालबहादुर शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,
भांडूप (पश्चिम) मुंबई ४०० ०७८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २९/१०/२००९
सुनावणीची तारीख १८/१२/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी सादर केलेल्या अपीलात अर्ज व प्रथम अपील हे स्वप्निल मोहन गायकवाड यांच्या नावाचे आहे व द्वितीय अपील मात्र प्रकाश जयसिंग सोनमळे यांच्या नावाने केलेले आहे. त्यामुळे हे अपील रद्दबातल करता येण्यासारखे आहे. अपीलार्थीस अशी माहिती पाहिजे होती की, श्री. सहदेव तुकाराम मरगळे हे चालवित असलेल्या इटिंग

हाऊसला दि. ४/३/१९९८ रोजी जी नोटीस दिली होती त्याची प्रत पाहिजे होती. मात्र ती प्रत शोध घेऊनहि सापडत नाही असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नमूद केलेले आहे. इतक्या वर्षाच्या कालावधीनंतर ही तृतीय पक्षाची माहिती प्रयत्न करुनहि सापडत नाही हे नाईलाजाने मान्य करावे लागेल.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १९ डिसेंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९०२/अपील क्रमांक ५११०/०२

श्री. अरुण रघुनाथ कोळी व इतर -----अपीलार्थी
चेरेश्वर मंदिर जवळ, ट्रॉम्बे कोळीवाडा,
मुंबई ४०० ०८८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
महापालिका मार्ग, तळमजला, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा उप कर निर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
महापालिका मार्ग, तळमजला, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २९/१०/२००९
सुनावणीची तारीख १८/१२/२००९
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना गावठाण व कोळीवाडयातील मालमत्ता कर व जल देयकाच्या देयकामधून मलनिःस्सारण कर याची दुहेरी आकारणी तर होत नाही हे पाहण्यासाठी कांही माहिती पाहिजे होती. अपीलार्थींना दि. २४/६/२००९ रोजीच्या पत्राने ही माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच अपीलार्थींना "अे" वार्डासाठीची माहिती मिळाली व तशी इतर वॉर्डांची मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलार्थी ज्या पध्दतीने माहिती मागतात त्या पध्दतीने इतर वॉर्डात माहिती ठेवल्या जात नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. "अे" वॉर्डात अशा प्रकारच्या मालमत्तांची संख्या कमी आहे म्हणून कदाचित ते माहिती अपीलार्थीस देऊ शकले असतील.

दोन्ही पक्षाशी चर्चा करुन याची खातरजामा करुन घेण्यासाठी अपीलार्थी हे सोमवार दिनांक २१/१२/२००९ रोजी सकाळी ११-०० वाजता एम/ईस्ट वॉर्डामध्ये जातील व त्यांना उपरोक्त विषयासंदर्भातले सर्व रेकॉर्ड दाखविण्यांत येईल व त्याची खात्री पटवून घेण्यात येईल असे सर्व संबंधितांशी चर्चा करुन ठरविण्यांत आले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

उपरनिर्दिष्टप्रमाणे संबंधितांनी कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १९ डिसेंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १४०८/०२

श्री. सियाराम सिंगा पाडवी, वगैरे -----अपीलार्थी
नर्मदा बचाव आंदोलन, मैत्री निवास,
काकावाडीच्या मागे, धडगांव,
ता. धडगांव, जि. नंदुरबार.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता -----उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
मोलगी, ता. अक्कुलकुवा, जि. नंदुरबार.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोलगी,
ता. अक्कुलकुवा, जि. नंदुरबार.

***---विवेचन---***

अपीलार्थी सियाराम सिंगा पाडवी यांनी त्यांच्या दि. ११/५/२००९ रोजीच्या अर्जाने जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप विभाग मोलगी यांच्याकडे पुढील माहिती मागितली होती.

" डनेलगांव ता. अक्कलकुव्यातील कुवडीडुंगर ते हिरही ते हेराईपाडा या रस्त्यासंदर्भात रस्ता कोणत्या योजनेत आहे, तो मंजूर आहे किंवा नाही, मंजूर असल्यास कुठून कुठे, उद्घाटने केले का , बोर्ड लावला का १, अंदाजपत्रक मंजूर संख्या व मुळ रजिस्टर, हजेरी पत्रकाची प्रत मागितली होती. "

अपीलार्थीस दि. १९/५/२००९ रोजीच्या पत्राने अत्यंत जुजबी माहिती देण्यांत आली व इतर माहितीसाठी शाखा अभियंता अथवा प्रभारी वरिष्ठ लिपीक यांना भेटावे असे कळविण्यात आले. माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी दि. ६/७/२००९ रोजी अपील दाखल केले. दि. १४/७/२००९ रोजीच्या अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने जन माहिती अधिकारी यांनी दि. २७/७/२००९ पर्यंत अपीलार्थींना माहिती द्यावी, अन्यथा नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल असेहि अपिलीय आदेशात नमूद केलेले आहे. या आदेशानंतरहि अपीलार्थीस प्रत्यक्ष माहिती ही दि. ५/९/२००९ रोजीच्या पत्राबरोबर देण्यांत आली.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाप्रमाणे माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थींनी आयोगाकडे दि. २२/८/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि. ८/१२/२००९ रोजी धुळे मुक्कामी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

हजेरी पत्रकाच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, हजेरीपत्रक हे वेबसाईटवर उपलब्ध आहे व मुळ हजेरी पत्रक हे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यांत आलेले आहे. तेव्हा असे निर्देश देण्यात आले की, मुळ हजेरीपत्रक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस त्याच्या प्रती विनामूल्य देण्यांत याव्यात.

अपिलीय अधिका-यांनी दि. २७/७/०९ पर्यंत अपीलार्थीस माहिती द्यावी असे स्पष्ट आदेश दिलेले असतांना सुध्दा अपीलार्थीस प्रत्यक्ष माहिती दि. ५/९/२००९ रोजी देण्यांत आलली आहे.

म्हणजेच अपीलार्थीस माहिती देण्यात ३९ दिवसांचा विलंब लावलेला आहे. या विलंबाबद्दलची शास्ती रु. ३९ X २५०=रु. ९,७५०/- इतकी होते. ही शास्ती प्रभारी वरिष्ठ लिपीक व संबंधित शाखा अभियंता तथा सहायक माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप विभाग मोलगी यांच्यावर सयुक्तरित्या व सम प्रमाणात लादण्यात येत आहे. म्हणजेच प्रत्येकी रु.४,८७५/- प्रमाणे ही शास्ती संबंधितांच्या १ फेब्रूवारी, २०१० रोजी मिळणा-या पगारातून उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मोलगी यांनी वळती करुन घेऊन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व चलनाच्या प्रतीसह आयोगास दि. १५ फेब्रूवारी, २०१० पर्यंत आयोगाच्या मुंबई कार्यालयास अनुपालन अहवाल पाठवावा.

---आदेश---

अपील मान्य करण्यात येत आहे.

वर निर्देशिल्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्यांत यावी.

अपिलीय अधिकारी यांनी शास्तीच्या रक्कमेबाबत आयोगाच्या आदेशाचे पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २४ डिसेंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ९२२/०२

श्री. सुभाष साहेबराव पाटील -----अपीलार्थी
रा. तांदुळवाडी, ता. भडगांव, जि. जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी -----उत्तरवादी
भडगांव, ता. भडगांव, जि. जळगांव.

२.जन माहिती अधिकारी
तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालय,
भडगांव, ता.भडगांव, जि.जळगांव.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक १३/१०/२००९
सुनावणीचा दिनांक २६/११/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. सुभाष साहेबराव पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३/१०/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २७/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/५/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

१.. शेती शाळा या शाळेचे अनुदानापोटी शेतीशाळा करिता रु. १७,०००/- अनुदान मिळाले आहे. भडगांव तालुक्यात किती शेती शाळा आहेत त्यांच्या संपूर्ण खर्चाचे बिल मिळण्याबाबत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांकडून विहित कालावधीत कोणतीही माहिती दिली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी दि १६/६/२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु तरीही माहिती देण्यांत येईल असे आश्वासने देऊनहि अपीलार्थीस माहिती देण्यांत आली नाही.

सदर दोन्ही जबाबदार अधिका-यांनी कबूल करुनहि अपीलार्थीस माहिती न दिल्याने अपीलार्थीनी व्यथित होऊन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व अपीलार्थी हजर होते. अपीलार्थीस दोन दिवसांत माहिती देतो असे सांगून प्रत्यक्षात कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे दिली नाहीत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस सदर माहिती देण्याचे जाणून बुजून टाळलेले दिसते. ही त्यांची कृति त्यांच्या जबाबदा-या व कर्तव्यास अनुसरुन नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येतात की, त्यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आंत अपीलार्थीना हवी असलेली माहिती विनामूल्य पुरवावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा. तसेच आजतागायत माहिती देण्यात आलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर रु. ५,०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. ती १ फेब्रूवारी, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल तालुका कृषि अधिकारी भडगांव, जि. जळगांव यांनी आयोगास १५ फेब्रूवारी, २०१० पर्यंत सादर करावा.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हवी असलेली माहिती १० दिवसात पुरविण्यात यावी.

शास्ती वसूलीची कार्यवाही करुन तालुका कृषि अधिकारी, भडगांव यांनी आयोगास तसा अहवाल १५ फेब्रूवारी, २०१० पर्यंत पाठवावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक २९ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२९०/०२**

**श्री. सुभाष ओंकार अहिरे -----अपीलार्थी**
**रा. वरखेडी, ता. पाचोरा,**
**जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी -----उत्तरवादी**
**पाचोरा, जि. जळगांव.**

**२.जन माहिती अधिकारी**
**तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालय,**
**पाचोरा, जि.जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २/३/२००९**
**सुनावणीचा दिनांक २७/११/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. सुभाष ओंकार अहिरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २/३/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २७/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.**

**अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२/१२/०८ व २९/१२/०८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.**

१. श्री. एस. ओं. अहिरे यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही प्रस्ताव सादर करणेबाबत.

२. विभाग वरिष्ठानी तालुका कृषि अधिकारी पाचोरा यांना दिलेले संदर्भासहीत पत्र व स्मरणपत्राच्या छायांकित प्रती.

३. कार्यालयीन प्रमुखांनी प्रस्तावातील आरोपाबाबत सर्व विषयांचे ज्ञापन पत्र व प्राथमिक

चौकशीच्या पत्राची छायांकित प्रत इत्यादी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस पत्र क्र. २४८१ दि. २९/१२/२००९ रोजी उत्तर दिले त्या उत्तराने अपीलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत त्यामुळे माहितीहि दिली नसल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्या अपीलावर दि. २७/११/२००९ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस फक्त उत्तर दिले होते. याचा अर्थ माहिती दिली असा होत नाही.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर महिना उलटला तरी सुनावणी घेतली नाही अथवा कोणत्याही प्रकारे माहिती दिलेली नाही.

दोन्ही जबाबदार अधिका-यांनी अपीलार्थीना माहिती न देण्याचे सयुक्तिक कारण समजू शकले नाही. फक्त द्वितीय सुनावणीच्या वेळी माहिती देण्यांत येत आहे असे नमूद केले आहे. प्रत्यक्ष माहिती दिलेली नाही. यावरुन असा निष्कर्ष निघू शकतो की, अपीलार्थीस माहिती देण्याचे जाणून बुजून टाळलेले दिसते. ज्या कारवाई विषयी माहिती पाहिजे ती अपीलार्थीविरुध्दची असल्याने अपीलार्थीस हवी असलेली माहिती १० दिवसांत विनामूल्य पुरविण्यात यावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेतली नाही व आदेशहि पारित केलेले नाहीत. असे करण्याचा त्यांचा उद्देश समजू शकला नाही. यास्तव त्यांनी आदेश पारित न केल्याचा खुलासा १० दिवसांत उलटटपाली पाठवावा.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३० डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२००/०२

श्री. शफिक अहमद हबीब शाह -----अपीलार्थी
शाहकार, मनिषा कॉलनी,
विक्रीकर भवनाजवळ, जिल्हापेठ जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता -----उत्तरवादी
जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता
जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४/७/२००८
सुनावणीचा दिनांक २६/११/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. १/२/२००८ च्या अर्जान्वये सप्टेंबर, २००४ ते ऑगस्ट २००७ या कालावधीत अपीलार्थीनी त्यांना अतिरिक्त कार्यभार मिळण्याबाबत दि. ६/९/२००४ रोजी जो प्रस्ताव सादर केला होता त्याबाबतची माहिती मागितली. परंतु त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. २७/३/२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. २८/४/२००८ रोजी सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी त्यांना त्यांच्या मागणीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्यात आली व अपील निकाली काढण्यात आले. यावर समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, अपीलार्थीना माहिती देण्यात आलेली आहे. तथापि यावर अपीलार्थीचे असे म्हणणे होते की, जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिलेली आहे. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून असे निर्देश देण्यात आले की, अपीलार्थीनी वेळोवेळी जे अर्ज दिले आहेत त्याचा शोध घेण्यात यावा व त्यावर जी काही कार्यवाही कार्यालयाने केली असेल त्याचा तपशील सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अपीलार्थीना विनामूल्य द्यावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३० डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ११५०/०२**

**श्री.युवराज मानसिंग पाटील -----अपीलार्थी**
**७, लक्ष्मी सदन, इंडिया गॅरेज रोड,**
**जिल्हापेठ, ता.जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा आयुक्त -----उत्तरवादी**
**राज्य गुप्ता वार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

२.जन माहिती अधिकारी तथा अपर आयुक्त
राज्य गुप्ता वार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.

---*विवेचन*---

अपीलार्थी श्री. युवराज मानसिंग पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४/०४/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २६/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते, अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८/८/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १. पोलीस नाईक १६८९ पांडुरंग उदयसिंग पाटील यांच्या संदर्भात जा.क्र.५२८/आशा २/मा.अधि/नकला/०७ बाबत व सेवा पुस्तिका पहिल्या पानाचे झेरॉक्स प्रतसह तात्काळ
माहिती मिळावी.

२. जा.क्र.५२८/आशा/२/माहिती बदली/०७ संदर्भ - मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र. १८३१७/०७, दि. १४/०५/२००७ नुसार काय कारवाई करण्यात आली
त्याबद्दल माहिती मिळावी.

३. शासन अध्यादेश २००६, दि. ११/०५/०६ अन्वये पोलीस शिपाई १६८९ यांची बदली होणेसंदर्भात अर्ज केला होता. सदर शिपाई आपल्या आस्थापनेवर आहे. सबब वरील सर्व मुद्दयांविषयी काय कार्यवाही करणेत आली याची माहिती मिळावी. "

जन माहिती अधिकारी यांजकडून विहित मुदतीमध्ये कोणतीही माहिती प्राप्त न झ ााल्याने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी कलम १९(१) अन्वये दि १०/१२/२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांजकडे अपील केले होते. त्यासंदर्भात उप आयुक्त(प्रशासन), राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दि. ७/१/२००८ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे अपीलार्थीस कळविलेले आहे.

"१. श्री. पी.यु.पाटील, स.गु.अ. यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानावरील मजकूर हा त्यांचा

वैयक्तिक शासकीय अभिलेख असल्याने तो पुरविणेबाबत त्यांनी हरकत घेतलेली आहे.

२.. श्री. पी.यु. पाटील, स.गु.अ. यांचे प्रकरणी कार्यवाही बाबत मुद्दा क्र. २ मधील नमूद शासन पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

३.. रा.गु.वि. मध्ये नेमणूका या कार्यकारी दलातून प्रतिनियुक्तीने केल्या जातात. संबंधित कर्मचारी यांची उपयुक्तता लक्षात घेऊन त्यांना रा.गु.वि. मध्ये ठेवण्यात येते. "

दि. ७/१/२००८ च्या आदेशाविरुध्द अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ४/४/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले, ज्यावर दिनांक २६/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. श्री. पी.यु.पाटील, स.गु.अ. यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानावरील मजकुर हा त्यांचा वैयक्तिक शासकीय अभिलेख असल्याने तो पुरविणेबाबत श्री. पी.यु.पाटील यांनी हरकत घेतल्यामुळे सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही असे दिसते. मात्र या माहितीत एकदम खाजगी असे कांहीही नाही. तेव्हा ही माहिती ७ दिवसांत अपीलार्थीस देण्यात यावी. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश--***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ३० डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**
**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४०४४५/अपील क्रमांक ४५२२**
**/०२**

**श्री.विनोद के. मिश्रा -----अपीलार्थी**
**नगिना चाळ, यादव नगर,**
**खैरानी रोड, साकीनाका, मुंबई ४०० ०७२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**शासकीय दंत महाविद्यालय इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई ४०० ००१.**

**२.जन माहिती अधिकारी**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,**
**शासकीय दंत महाविद्यालय इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपीलार्थीचे तारीख नसलेले पण आयोगाच्या कार्यालयास दि. ५ मे, २००९ रोजी प्राप्त झालेल्या अपीलाची सुनावणी दि. ४ ऑगस्ट, २००९ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

सुनावणीच्या वेळेला संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांनी सदर अपीलाशी संबंधित पुढीलप्रमाणे निवेदन आयोगास सादर केले.

" आयोगाच्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने आयोगास सादर करण्यात येते की, आयोगाच्या पत्रासोबत प्राप्त अपीलाच्या अनुषंगाने मा. आयोगासमोर दि. १७ मार्च, २००९ रोजी सुनावणी

झाली असता सदर सुनावणीच्या वेळी संचालनालयामार्फत योग्य ते अभिप्राय मा.आयोगास सादर करण्यात आले होते. तसेच सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने योग्य तो खुलासा मा.आयोगास दि. ३० मार्च, २००९ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी मा. आयोगाने दि. ३० जून, २००९ च्या आदेशान्वये अर्जदाराचे अपील अंशतः मान्य केले असून आदेशांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

आता आयोगाकडे पुन्हा त्याच प्रकरणाची सुनावणी दि. ४ ऑगस्ट, २००९ रोजी दुपारी ३-३० वाजता ठेवण्यात आली आहे. मा. आयोगाने या प्रकरणी दि. ३० जून, २००९ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत संचालनालयास दि. २० जुलै, २००९ रोजी प्राप्त झाली असून या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही संचालनालयामार्फत करण्यात येत असून अर्जदारास मा. आयोगाच्या निर्देशांप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. "

अपीलार्थीच्या मुद्दयांचा परामर्श ३० जुन, २००९ रोजीच्या आदेशात घेतला असल्याने नव्याने आदेश देण्याची गरज नाही. सबब पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२८७/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२८८/०२**

**श्री. पुंडलिक देवराम वारके -----अपीलार्थी**
**रा. सावदा (काझीपुरा) ता.रावेर,**
**जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक -----उत्तरवादी**
**सहकारी संस्था जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक**
**सहकारी संस्था रावेर, जि. जळगांव.**

**२. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**

सहकारी संस्था जळगांव.

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक
सहकारी संस्था जळगांव, जि. जळगांव.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक ५/३/२००९
सुनावणीचा दिनांक २७/११/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १६/१०/२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. कार्यालयाचे पत्र क्र. अपील क्र. ७१/०८/तक्रार/०८ दि. २९/८/२००८ च्या पत्रानुसार मागितलेल्या चौकशी अहवालाची प्रत.

२. उपरोक्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ३/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु यावर सुनावणी झाली नाही व माहितीसुध्दा मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केली.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की, अपीलार्थींच्या दि. २१/६/२००८ रोजीच्या अर्जास अनुसरुन माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपीलार्थींच्या दि. १६/१०/२००८ रोजीच्या अर्जात जिल्हा उपनिबंधक यांचेकडील दि. २८/८/०८ चे पत्रानुसार चौकशी व कार्यवाहीची प्रत अपीलार्थींस पाहिजे होती.

संबंधित कर्मचा-यांची चौकशी केली असता अर्जदाराचे तक्रारीत तथ्य नसल्याचे दि. २३/१०/२००८ रोजी अर्जदारास कळविण्यात आले आहे. जिल्हा उपनिबंधक यांना सादर केलेल्या अहवालाची प्रतहि अर्जदारास देण्यात आली आहे. या व्यतिरिक्त कोणतेहि

कागदपत्र नाहीत असे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले. अपीलार्थी अनुपस्थित होते त्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेतला आले नाही.

<u>*---आदेश---*</u>

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४०५४५/तक्रार क्रमांक ४६८/०१

श्री. कमलाकर आर. शेणॉय -----तक्रारदार
२/१३, आदिनाथ सहकारी गृहनिर्माण संस्था,
एली कादुरी स्कूल समोर, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक -----उत्तरवादी
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

२. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीसअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २६/४/२००९
सुनावणीचा दिनांक ५/०९/२००९
अपीलार्थी तक्रारदार, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

तक्रारदार श्री. कमलाकर शेणॉय यांची अशी तक्रार आहे की, त्यांच्या माहिती अर्जात मागितल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली नाही. यास्तव संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याबद्दल अधिनियमाच्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यावरुन असे दिसून आले की, तक्रारदारांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली आहे. यावर आयोगाने असे निर्देश दिले की, तक्रारदारांनी त्यांचे समाधान करुन घेण्याचे दृष्टीने हवी तर कागदपत्रांची तपासणी करुन घ्यावी म्हणजे सत्यतेबाबत त्यांच्या मनात कोणतीही शंका राहणार नाही.

---*आदेश*---

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक ३१ डिसेंबर, २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

क्रमांक-मु.मा.आ/२३५११/तक्रार क्रमांक ३४९/०१

श्री.नदीम  एम उमरभॉय -----तक्रारदार
नरिमन बिल्डींग, ६ वा मजला,
फ्लॅट नं.१२ अे, १६२, एम.के. रोड, मुंबई ४०० ०२९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (१४ स) -----उत्तरवादी
सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,
मुंबई -- ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,(१४ स)
मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.

३.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था, ए विभाग, मल्होत्रा हाऊस,
फोर्ट , मुंबई  ४०० ००१.

***---विवेचन---***

दि. १८/११/२००६ रोजीच्या आदेशाने स्वस्तीक गृहनिर्माण संस्था, अनिस सहकारी गृहनिर्माण संस्था, अॅड्रोमेडा सहकारी गृहनिर्माण संस्था या तीन संस्थांच्या ज्या कागदपत्रांची मागणी तक्रारदार श्रीयुत नदीम  उमरभॉय यांनी केलेली होती.  पण जे कागदपत्र उपनिबंधक यांच्या कार्यालयात  अे- रेकॉर्ड म्हणून ठेवायला पाहिजे  होती पण  ती आज उपलब्ध होत नाहीत  ती कागदपत्रे  संबंधित सोसायटीच्या पदाधिका-यांना बोलावून घेऊन नस्ती  रि-कंन्स्ट्रक्ट करण्याचा प्रयत्न करावा व तक्रारदारास आवश्यक ती माहिती देण्यात यावी.  सदरची कारवाई दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी असे निर्देश दिले होते.  परंतु त्याबाबत कांहीही कार्यवाही न  झाल्यामुळे तक्रारदार यांनी  दि. २१ फेब्रूवारी, २००७

रोजीच्या पत्राने आयोगाकडे तशी तक्रार केली. यासंदर्भात मंत्रालयीन विभागाने सुध्दा संबंधित उपनिबंधकांना कार्यवाही करण्यास कळविले होते.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

" अनिस को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. व स्वस्तिक को.ऑप.हौसिंग सो. लि या संस्थांची नोंदणी अनुक्रमे सन १९५५ व सन १९६३ साली झालेली आहे. संस्थांच्या नोंदणीबाबतची कागदपत्रे त्यांचे कार्यालयात तक्रारदारांनी माहिती मागितली तेव्हा सन २००६ मध्ये आढळून आलेली नव्हती. त्यामुळे सदर संस्थांच्या नोंदणीबाबतची कागदपत्रे संस्थेकडून प्राप्त करुन संस्थांच्या अ धारीका पुर्नगठीत करण्यात आल्या आहेत.

सदर अपीलाबाबत त्यांचे कार्यालयाने स्वस्तीक को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेच्या पदाधिका-यांना दिञ २९/१२/२००४ , ३/१/२००५, ११/१/२००५ व १८/१/२००५ या तारखांना रितसर सुनावण्या देऊन सदर विषयाबाबत माहिती संस्थेच्या पदाधिका-यांकडून संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करुन घेऊन दि. १५/१/२००७ रोजी श्री. नदीम उमरभॉय यांचे वतीने श्रीमती गोम्स यांनी त्यांचे कार्यालयातून प्रत्यक्ष स्वीकारलेल्या आहेत. उपरोक्त कागदपत्रे ही राज्य माहिती आयोग यांच्या आदेशाप्रमाणे दोन महिन्यात देण्यात आलेली आहेत. तसा अहवाल या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. मुंबई उपनि/अे-विभाग/बी-२/मा.अ./उमरभॉय-०७ दिनांक ७/३/२००७ रोजी दिल्याचे या कार्यालयातील जा.क्र.सम१७७०/०७ दि. १९/१२/२००७ रोजीच्या पत्राने मा. कक्ष अधिकारी, १४ सी, मंत्रालय यांना याबाबत कळविलेले आहे.

याबाबत या कार्यालयाने आवश्यक ती कार्यवाही केली असल्याने श्री. नदीम उमरभॉय यांनी दाखल केलेले अपील क्र. रामाआ-२००९/२३५११/तक्रार ३४९/०७/०९ दि. २/९/२००९ हे फेटाळण्यात यावे ही विनंती. "

उपरोक्त निवेदनाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे यथाशक्ती नस्तीचे पुर्ननिर्माण करुन अर्जदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

<u>*---आदेश---*</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/३४९३६/अपील क्रमांक ३६०७/०२

श्री.राजन अलीमचंदानी -----तक्रारदार
४७/ ब, व्हेनस को.ऑप.हौ.सोसायटी,
डॉ. आर. जी. ठडानी मार्ग, वरळी,
मुंबई ४०० ०१८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी
सहकार, पण व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.

<u>*---विवेचन---*</u>

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : ०५.०७.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक :१. २९/७/२००८ (कार्यासन १४ स)
२. १०/८/२००८ (कार्यासन ५ स)
३.२८/८/२००८(विभागीय सहनिबंधक, सह.संस्था मुंबगई विभाग.)

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. : ११.०८.२००८

प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : १७.०९.२००८

द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : १६.०९.२००८ चे अपील दि.२३/९/०८ रोजी दाखल

सुनावणीचा दिनांक : ३१/१/२००९

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : उपस्थित

उत्तरवादी (२) : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

श्री. राजन अलिमचंदानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५, मधील कलम १९(३) अन्वये मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांच्याकडे दि. १६/९/०८ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

श्री. राजन अलिमचंदानी यांनी दि. ५/७/०८ च्या माहितीच्या अधिकारातील अर्जान्वये खालील मुद्दयांवर माहिती मिळण्यासाठी विनंती केली होती.

१. दिनांक १०/३/०८ च्या पत्राची सद्य:स्थिती.
२. श्री. महेंद्र कल्याणकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दिलेल्या स्थगिती आदेशाबाबतची सद्य:स्थिती.
३. स्थगिती देण्याची कारणे काय आहेत.

४. स्थगितीला किती वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे त्याबाबतची कारणे.

५. श्री. नारायण बन्सीलाल मुंदडा आणि श्री. एस.झापडे यांना लाचलुचपत विभागाकडून अटक झाली होती. त्या प्रकरणाची सद्य:स्थिती.

६. श्री. दिपक खांडेकर यांना अटक करण्यात आली होती त्या प्रकरणाची सद्य:स्थिती.

७. श्री. शिवाजी दत्तात्रय पहिनकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांना लाचलुचपत विभागाने अटक केली होती. त्याबाबतची सद्य:स्थिती आणि इतर ज्या अधिका-यांविरुध्द चौकशी प्रलंबित आहे त्यांची नांवे देण्यात यावी.

८. दिनांक ८/२/२००८ च्या तक्रारीची सद्य:स्थिती.

९. "बी" ब्लॉक ला केलेल्या दुरुस्ती कामात करण्यात आलेली अनियमितता याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती.

१०. "बी" ब्लॉक मधील व्यवस्थापकीय समितीच्या सदस्याने अवैध व अनधिकृतरित्या केलेल्या बांधकामाविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली.

११. थकबाकीदाराविरुध्द कोणती कार्यवाही केली याबाबतची सद्य:स्थिती.

१२. श्रीमती. शशी गुप्ता यांच्या दि. १४/५/०८ च्या तक्रारीवर कोणती कार्यवाही केली याबाबतची

सद्य:स्थिती.

सदर माहितीच्या अधिकारातील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास शासनपत्र क्रमांक केमाअ-०७०८/प्रक्र३२७/१४-स, दि. २९/७/०८ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपल्या अर्जातील मुद्दा क्र. २,३,४,९,१०,११,१२ हे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांचेशी संबंधित आहेत व मुद्दा क्र. ५,६,७,८, हे या विभागातील कार्यासन ५-स शी संबंधित असल्याने आपल्या अर्जाची प्रत संबंधितांकडे आपणांस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविण्यात येत आहे. आपण त्या कार्यालयाशी संपर्क साधावा व मुद्दा क्र. १ बाबत असे अवगत केले की त्यांनी प्रधान सचिव (सहकार) यांचेकडे केलेला दि. १०/३/०८ चा अर्ज

शासन पत्र क्र. सगृयो २००८/९१८/१४ स दि ७/४/०८ अन्वये रोजी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

श्री. अलिमचंदानी यांनी दि. १०/३/०८ च्या पत्रान्वये प्रधान सचिव (सहकार) यांचेकडे व्हीनस को.ऑप.हौ.सो. वरळी या संस्थेच्या व्यवस्थापन समितीने बंधपत्र भरुन न दिल्याबाबत जिल्हा उपबिंधक, विभागीय सहनिबंधक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने समिती बरखास्त करण्यात आली त्यावर समितीने विभागीय सहनिबंधक यांचेकडे अपील केले व बरखास्तीच्या आदेशास "स्थगिती" घेतली. एकतर्फी स्थगिती का देण्यात आली अशी या पत्रात मागणी करण्यात आली होती. स्थगिती आदेश देण्याचे हे quashi judicial असल्याने आणि विभागीय सहनिबंधक यांनी स्थगिती दिली असल्याने सदरची बाब विभागीय सहनिबंधक, स.सं. मुंबई विभाग, मुंबई यांचेशी संबंधित असल्याने त्यांचा दि. १०/३/०८ चा अर्ज पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला. श्री. अलिमचंदानी यांनी माहितीच्या अधिकारातील दि. ५/७/०८ च्या अर्जात नमूद केलेल्या १२ मुद्दयांबाबत त्यांना सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे

दरम्यानच्या कालावधीत श्री.अलिमचंदानी यांनी दि. ११/८/०८ च्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील केले. सदर अपील अर्जाच्या अनुषंगाने शासनपत्र दि. २७/८/०९ च्या पत्रान्वये दि. १२/९/०८ रोजी दुपारी ३-०० वाजता सुनावणीस हजर राहण्याच्या सूचना दिल्या तथापि त्यांनी आपण दि. १२/९/०८ रोजी हजर राहू शकत नाही. दि. १६/९/०८ रोजी सुनावणी ठेवावी अशी विनंती केली त्यानुसार दि. १६/९/०८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १७/९/०८ रोजी आदेश पारित केले. सुनावणीस श्री. अलिमचंदानी, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई कार्यालयातील श्री. हेलोडे, सहकार अधिकारी श्रेणी २, व जन माहिती अधिकारी श्री. जाधव हजर होते.

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव (श्री.चौधरी) यांनी दि. १७/९/०८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी जिल्हा उपनिबंधक, मुंबई १ यांना दि. २३/९/०८ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. श्री. अलिमचंदानी यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचे क्रमांक विसनि/मुंबइ/आस्था-२, ५१०७/०८ दि. २८/८/०८ च्या पत्राबाबत दुसरे अपील केलेले आहे. त्यामुळे सुनावणीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी, विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनीही या सुनावणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : अपीलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपीलात मुद्दा क्रमांक ५ **Date of receipt of the order appealed against** या समोर जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक, सह.संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्या दि. २८/८/२००८ च्या आदेशाचा उल्लेख केलेला आहे व त्याची प्रत द्वितीय अपीलासोबत जोडलेली आहे. एखादया जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द अर्जदारास प्रथम अपिलीय प्राधिकारी (जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ अधिकारी) यांचेकडे कलम १९(१) अन्वये अपील करणे अपेक्षित असते. प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी उपरोक्त दि. २८/८/२००८ च्या आदेशाविरुध्द विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्या कार्यालयातील प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता थेट आयोगाकडे द्वितीय अपील केलेले आहे.

## ---आदेश---

विहित कार्यपध्दती न चोखाळता जन माहिती अधिकारी यांच्या आदेशाविरुध्द थेट राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्यामुळे हे अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२८२/०२

श्री. महम्मद शफी अकमलोद्दीन काझी -----अपीलार्थी
काझी वाडा, काझी चौक, मु.पो. अमळनेर,
जि. जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक -----उत्तरवादी
भूमि अभिलेख, जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमि अभिलेख, जळगांव.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक ४/४/२००९
सुनावणीचा दिनांक २७/११/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २९/११/२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. अमळनेर येथील रेकॉर्डमध्ये पोट हिस्सा टिपण बुके आहेत किंवा कसे व असल्यास किती टिपण बुके आहेत.

२. टिपण बुके सर्व्हे नंबर प्रमाणे स्वतंत्र असतात किंवा कसे

३. सर्व टिपण बुके असल्यानंतर फक्त एकच म्हणजे सर्व्हे नं. ३३ चे पोट हिस्सा टिपण बुक गायब होऊ शकते किंवा कसे १

उपरोक्त अर्जाच्या अनुषंगाने दि. २०/१२/२००८ च्या पत्रान्वये माहिती अपीलार्थींना पुरविण्यात आली. परंतु यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि १२/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि. १८/२/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार अपीलार्थींना माहिती पुरवावयाची होती. परंतु या आदेशान्वये चुकीची माहिती दिल्याची सबब दर्शवून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिक्ारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले की, अपीलार्थींना त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यात आली आहे. रेकॉर्ड एवढसा जीर्ण स्वरुपात आहे की, त्याची प्रत देता येणे शक्य नाही हे सुनावणीच्या वेळी दाखविले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक
१२८४/०२

सौ. कविता दयालदास फुलवाणी -----अपीलार्थी
रुम नं. ३२३ च्या मागे, सिंधी कॉलनी,
मु.पो. भुसावळ, जि. जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा परीक्षक व -----उत्तरवादी
स्थानिक निधी लेखा,
नाशिक विभाग, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखा परीक्षक व
स्थानिक निधी लेखा, भिकमचंद जैन मार्केट,
३ रा माळा, सी- हॉल, जळगांव- ४२५ ००१.

## ---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक ५/४/२००९
सुनावणीचा दिनांक २७/११/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. ३०/१२/२००८ च्या अर्जान्वये शिक्षण विभाग, नगर परिषद, भुसावळच्या लेखा परीक्षण अहवालातील मुद्दयांबाबत प्रश्न उपस्थित करुन त्यांच्यावर झ ालेला अन्याय दुर करण्याबाबत नगरपरिषदेने दिलेल्या अनुपालन अहवालावरील कार्यवाहीबाबत मागणी केली. यावर दि. १५/१/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीना कळविले की, लेखा आक्षेपाचे परिपूर्ण अनुपालन नगरपरिषदेने सादर केल्यास त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि. १०/२/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि. १७/:/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर कायम करण्यात येऊन अपील खारीज करण्यात आले. यावर अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केल्याप्रमाणे अपीलार्थीना माहिती देण्यात आली आहे व मार्गदर्शनहि केलेले आहे. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांना नेमकी काय माहिती हवी आहे हे जाणून घेता आले नाही. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## ---*आदेश*---

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२८३/०२

श्रीमती. वंदना सुभाष इटवनकर -----अपीलार्थी
बालाजी पेठ, घर नं. ३७,
डॉ. रावेरकर यांच्या दवाखान्याजवळ, जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त -----उत्तरवादी
नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला,
जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
महानगरपालिका, जळगांव.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ४/४/२००९
सुनावणीचा दिनांक २७/११/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १७/१२/२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. सन १९९६ मध्ये सहायक पदावर सेवेत असलेले कर्मचारी श्री. भरत छगन दुसाने यांच्या सेवाकाळाची संपूर्ण माहिती.

२. त्यांनी कामगार उपायुक्त, नाशिक यांच्याकडे केलेली तक्रार व कामगार न्यायालयातील त्यांच्या संबंधित दावा याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती.

उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ५/२/२००९ रोजी प्रथम अपील केले. अपीलावर सुनावणी होऊन दि. २/३/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आलेत. अपीलार्थींनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांचे प्रथम अपील अमान्य करण्यात आले.

प्रथम अपीलावरील निर्णयाने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाला सांगितले की, अपीलार्थींनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे

उपलब्ध नाही. ती माहिती द्यावयाची झाल्यास कामगार उपायुक्त, नाशिक यांच्याकडून घेऊन अपीलार्थींना पुरवावी लागेल. अशी जर परिस्थिती होती तर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींचा अर्ज अधिनियमाच्या तरतुदीनुसार सुरुवातीलाच कामगार उपायुक्त यांचेकडे पाठवावयास पाहिजे होता.

आता महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकारी यांनी, कामगार उपायुक्तांच्या कार्यालयात स्वत: प्रयत्न करुन ती माहिती मिळवावी व ती १० दिवसात अपीलार्थीस द्यावी.

<u>*----आदेश---*</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ११६०/०२

श्री.झंवर महेश पुनमचंद -----अपीलार्थी
रा. शास्त्री मार्केट, मेन रोड,
जामनेर, जिल्हा जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (साप्रवि) -----उत्तरवादी
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक रोड,
नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
जामनेर नगरपरिषद, जिल्हा जळगांव.

---*विवेचन*---

अपीलार्थी श्री. झंवर महेश पुनमचंद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५/०७/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २६/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने सहायक प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तसेच जन माहिती अधिकारी (तत्कालीन व विद्यमान) उपस्थित होते, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११/१२/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

भारतीय पुरावा कायदा, १८७२ **"The court may presume existence of certain facts-that evidence which culd be and is not produced would,if produced,be**

unfavourable to the person who whith holds it" तर जा.क्र.नपजा/साप्र/आरआर/१७४६/२००५, दिनांक ५/१२/२००५ द्वारे मागणी करण्यात आलेली मे. महसूल व वन मंत्रालय, मुंबई यांचे दि. २५/९/८१ च्या पत्राचे कायदेशीर पुरावे सादर करण्यास न.प. आवक पत्र क्र. ३९४ दि. १७/१/०६ नुसार नकार देण्यात आल्याने संबंधितांवर जा.क्र. नपजा/साप्र/आरआर/१७४६/२००५, दि. ५/१२/२००५ च्या नोटीशीत नमूद केल्याप्रमाणे योग्य ती कारवाई

अ. करणेबाबत मुख्याधिकारी सो.न.प. यांची जबाबदारी आहे किंवा नाही याची माहिती योग्य त्या शासन नियमाप्रमाणे द्यावी.

ब. करणेबाबत न.प.ने कोणत्या कारवाई प्रावधान व व्यवस्था केलेली आहे, याची माहिती विस्तृत स्वरुपात द्यावी.

क. करणेकामी किती दिवसांचा निश्चित कालावधी लागेल याची माहिती योग्य त्या शासन नियमाप्रमाणे द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ८/१/२००८ च्या पत्रान्वये श्री. झंवर महेश पुनमचंद यांना उत्तर दिले. तथापि वस्तुनिष्ठ स्वरुपाची माहिती प्राप्त झालेली नसल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांजकडे दि. २७/१/२००८ रोजी मा.अ.अ.२००५ च्या कलम १९(१)अन्वये प्रथम अपील केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २०/२/२००८ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करुन दि. २७/२/२००८ रोजी आदेश पारित केले. अपीलार्थी यांचे अपील अंशतः मान्य करुन सामनेवाले यांनी प्रस्तूत आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दयांवर वस्तुनिष्ठ व मुद्देनिहाय माहिती मोफत पुरवावी असे आदेश प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिले.

अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २६/५/२००८ रोजी कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील केले. तथापि ते कोणत्या

कारणासाठी केले याचा उल्लेख द्वितीय अपीलात केलेला दिसत नाही. जन माहिती अधिकारी याजकडून प्रथम अपीलावर झालेल्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याबाबत अपीलार्थी यांनी द्वितीय अपील केले असावे असे दिसते. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित नसल्याने त्याची खातरजमा करता आली नाही.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दि. २६/११/२००९ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे वस्तुनिष्ठ माहिती सादर केली.

" श्री.महेश पुनमचंद झंवर, रा. जामनेर यांनी दि. ११/१२/०७ रोजी आवक क्र. ४९६७ अन्वये माहितीचे अधिकारात नगर परिषदेकडे अर्ज सादर केला होता. त्यानुसार नगर परिषदेने त्यांना जा.क्र.३४/०८ दि. ०८/०१/२००८ अन्वये माहिती पुरविली आहे.

तद्‌नंतर मे. महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन क्र. LRF/३२८१/२३८७/CR २४६३/ J-६ दि. २५/०९/२९८१ हे बनावट असल्याचे निष्पन्न झ ााल्याने, नगर परिषदेने अध्यक्ष जा.ता. एज्युकेशन सोसायटी जामनेर यांचे विरुध्द दि. ०३/०८/०९ रोजी जामनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. १०३/०९ अन्वये फसवणुकीचा गुन्हा नोंद केलेला आहे. त्या अनुषंगाने पुढील पोलीस तपास सुरु आहे.

नगर परिषदेने अर्जदार श्री. झंवर यांना विहित मुदतीत माहिती पुरविली असल्याने अर्जदाराचे अपील निकाली काढणेस विनंती आहे. "

या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>*---आदेश----*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२९३/०२**

**श्री. विनोदसिंह मानसिंह राजपूत ----अपीलार्थी**
**मु.पो. नगरदेवळा, ता. पाचोरा,**
**जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी -----उत्तरवादी**
**पंचायत समिती पाचोरा, जि. जळगांव.**

**२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी**
**ग्रामपंचायत नगरदेवळा, ता. पाचोरा,**
**जि. जळगांव.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ५/३/२००९
सुनावणीची तारीख २७/११/२००९
अपीलार्थी अनुपस्थित ,जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २२/५/२००७ च्या अर्जान्वये २००० ते २००७ या कालावधीतील घरकुलधारकाची यादी व ती मंजूरीसाठी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. या अनुषंगाने दि. १०/६/२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविले की, माहिती तयार असून त्याप्रित्यर्थ शुल्काची रक्कम भरुन त्यांनी घेऊन जावी.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १७/८/२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर दि. ४/९/२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचे आदेश अपीलार्थींना न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, प्रथम अपीलावरील सुनावणीच्या दिवशी म्हणजेच दि. ४/९/२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या समक्ष अपीलार्थींना माहिती दिली असून त्याप्रित्यर्थ मूळ अर्जावर त्यांची स्वाक्षरी घेतली आहे. अपीलार्थी सुनावणीसाठी गैरहजर असल्याने त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे हे जाणून घेता आले नाही. अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आलेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२७०/०२

श्री. विजय वसंत पाटील ----अपीलार्थी
मु.पो. मेणगांव, ता. जामनेर, जि. जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी -----उत्तरवादी
पंचायत समिती जामनेर, जि. जळगांव.

२.जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत मेणगांव, ता. जामनेर,
जि. जळगांव.

## ---विवेचन---

अपीलाचा दिनांक ६/३/२००९
सुनावणीची तारीख २७/११/२००९
अपीलार्थी ,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ९/९/२००८ च्या माहिती अर्जाद्वारे एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागितली.

१. मौजे माणगांव गावात कोणत्या वर्षी पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यात आली.

२. कोणत्या तारखेपासून त्याचा वापर सुरु झाला.

३. सरपंचायंच्या घरी मेन लाईनवचर कनेक्शन देण्यात आले आहे काय १

४. सरपंचांकडून पाणीपट्टीची वसूली होते काय १

५. सविस्तर नकाशा देऊन त्यात सरपंचाकडे कोठून कनेक्शन देण्यात आले हे दर्शवावे.

६. गावात एकूण किती पाणी सोडण्यात येते

७. वॉर्ड क्र. २ व ३ मध्ये पाणी सोडण्यासाठी किती व्हॉल्व आहेत.

८. कमलाबाई नारायण ढमाले किंवा त्यांच्या पतीस ग्रामपंचायत गावठाण वरील जागा कोणत्या वर्षी देण्यात आली, त्या वर्षाचे सरपंच व ग्रामसेवक कोण होते.

उपरोक्त माहिती अपीलार्थींना पुरविण्यात आली. परंतु पत्रावर दिनांक दिलेला नाही.

प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे नमूद करुन अपीलार्थींनी दि. ६/११/२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यावर निर्णय झाला नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपीलार्थींना संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसते की, अपीलार्थींनी विचारलेली माहिती व त्यांना पुरविण्यात आलेली माहिती यात विसंगती आहे. उदाहरणादाखल असे दाखविता येईल की, अ.क्र.८ मध्ये अपीलार्थींनी ग्रामसेवक व सरपंच कोण होते असे विचारले आहे. याला दिलेले उत्तर "सदर इसमास शासनाच्या नियमानुसार घरकुल मिळाले आहे." असे दिले आहे. तेव्हा सदर प्रकरणी असे निर्देश देण्यात येतात की, अपीलार्थींनी विचारलेल्या सर्व मुद्दयांवर त्यांना नेमकी व मुद्देसुद माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत विनाशुल्क पुरविण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १३०१/०२**

**श्री. अरविंद मधुकर नाईक ----अपीलार्थी**

रा. पाठक गल्ली,  जोशी मंदिराजवळ,
मु.पो.ता. अमळनेर, जि. जळगांव.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी  तथा तहसिलदार -----उत्तरवादी
तहसिलदार कार्यालय, धुळे.

२.जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी धुळे शहर
तहसिलदार कार्यालय, धुळे.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक  २५/३/२००९
सुनावणीची तारीख  २७/११/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी  व अपिलीय अधिकारी  उपस्थित.

अपीलार्थीनी  दि. १७/१२/२००८ च्या अर्जान्वये गट नं. १७ पै, प्लॉट नं. ४ च्या ७/१२ उता-याच्या अनुषंगाने प्रश्नार्थक स्वरुपात एकूण ६ मुद्दयांवर माहिती मागितली ते मुद्दे खालीलप्रमाणे-

१. ७/१२ वर आकार तसेच बिनशेती झालेली असल्यास त्यावर बिनशेती लिहिण्यात येते किंवा कसे १
२. बिनशेतीचा दर  दर १० वर्षाने वाढविण्यात येतो का१
३. करण्यात आलेली वसूली कोणत्या दराने केली १
४. दि. १२/९/०४ रोजी रु. ५०/- व  ३/१२/२००८  रोजी रु. १००/-  आकारण्यात आले त्याचा नियम.
५. वसूलीच्या पावतीवर वसूली कोणत्या वर्षाची आहे हे लिहिण्यात येते का १
६. पावतीवर खाते नंबर घालणे आवश्यक असते का १

उपरोक्त माहिती दि. ३१/१२/२००८च्या पत्राद्वारे अपीलार्थीस देण्यात आली. परंतु माहिती चुकीची असल्याचे नमूद करुन त्यांनी दि. ९/१/२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर दि. २४/२/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले व त्यानुसार अपीलार्थींना १५ दिवसांत माहिती द्यावयाची होती.

तथापि, माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अपीलार्थींना सर्व माहिती पुरविलेली आहे. अपीलार्थी उपस्थित नसल्याने त्यांना नेमकी काय माहिती पाहिजे हे जाणून घेता आले नाही. माहिती दिलेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२७९/०२**

**श्री.ॲड्. शेख जमिल शेख उस्मान -----अपीलार्थी**
**इमाम अहमद रजा कॉलनी, सावदा रोड,**
**रावेर, ता. रावेर, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद जळगांव, जि. जळगांव.**

**२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**उर्दु गर्ल्स हायस्कूल, हाथीशा मस्जिद, रावेर,**
**ता. रावेर, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १३/४/२००९**
**सुनावणीची तारीख २७/११/२००९**
**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी ॲड्.शेख जमिल शेख उस्मान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४/०४/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि.**

२७/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६/०२/२००९ रोजी अर्ज करुन खालील विचारणा केलेल्या माहितीचा तपशील.

१. उर्दु गर्ल्स हायस्कूल मधील शिक्षकाची नेमणूक

२. मुलींसाठीचा पोषक आहार इत्यादि बाबींची विचारणा करण्यात आली आहे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. ४/३/२००९ या आदेशानुसार कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती दिली गेली. परंतु हजेरीपटाची छायांकित प्रत कोणत्या कालावधी पर्यंतची पाहिजे याचा उल्लेख अर्जात नसल्याने तसेच कोणत्या कोर्टातील आदेशाची प्रत हवी हे स्पष्ट न झाल्यामुळे याबाबतची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र कांही शंकर कुशंका असल्यास संस्थेमध्ये प्रत्यक्ष येऊन दप्तराची पाहणी करुन घ्यावी असे कळविण्यांत आले.

याउपर अपीलार्थीनी योग्यती माहिती न दिली गेल्यामुळे दि. १९/३/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिक्-यांनी दि. २६/३/२००९ च्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीची दिशाभूल केलेली आहे. सबब विचारणा केलेली माहिती ८ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिले.

ॲड्.शेख यांना हवी असलेली माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द दि. १३/४/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. दि. २७/११/२००९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

वस्तुस्थितीनुसार संबंधितांचे तोंडी जबाब व उपलब्ध कागदपत्रांचा साकल्याने विचार करण्यांत आला. संबंधित कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती विहित मुदतीत उपलब्ध

करुन घ्यावयाची असते. जन माहिती अधिकारी यांनी याबाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस विहित मुदतीत कळविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३१ डिसेंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२९८/०२

श्री. विकास जगन्नाथ चोपडे -----अपीलार्थी
मेन रोड, मु.पो. यावल,
जि. जळगांव - ४२५ ३०१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी -----उत्तरवादी
नगरपरिषद यावल, जि. जळगांव.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक (सा.प्र.वि)
नगरपरिषद यावल, जि. जळगांव.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/३/२००९
सुनावणीची तारीख २७/११/२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. १२/११/२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

" दि. ६/२/१९९७ रोजी एस.डी.आय (पोस्ट) यांनी नगरपरिषद यावल ला दिलेल्या भेटीचा रिपोर्ट व त्या अनुषंगाने त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांच्या प्रती "

अपीलार्थींना उपरोक्त माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. १९/१२/२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि. १३/२/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार अपीलार्थींना त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावयाची होती. तथापि माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आलेली आहे. नगरपरिषदेकडे माहिती उपलब्ध नव्हती तेव्हा ती पोस्ट खात्याकडून मागवावी लागली व त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. अपीलार्थींना माहिती दिलेली आहे हे विचारात घेऊन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१ डिसेंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२८०/०२**

**श्री.विनोद जगन्नाथ पिंगळे -----अपीलार्थी**
**४५९, गढी, टिळक चौक, चाळीसगांव,**
**जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) -----**
**उत्तरवादी**

जिल्हा परिषद जळगांव, जि. जळगांव.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
आनंदीबाई बंकट मुलांचे हायस्कूल, चाळीसगांव,
जिल्हा जळगांव.

---*विवेचन*---

अपीलार्थी श्री. विनोद जगन्नाथ पिंगळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९/०४/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २७/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९/०९/२००८ रोजी अर्ज करुन

१. आनंदीबाई बंकट मुलांच्या शाळेतील शिक्षकांचे वैयक्तिक वेळापत्रक.
२. शिक्षकांना मंजूर केलेली कर्तव्य रजा इत्यादि बाबतची माहितीची विचारणा करण्यांत आली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. १५/१२/२००८ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्यास कळविण्यात आले. तसेच माहिती कोणत्या कालावधीची आहे हे स्पष्ट करण्यासाठी दि. १५/१२/२००८ रोजी कळविण्यात आले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली.

अपीलार्थीस माहिती देण्यास उशीर झाला असला तरी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक १२७८/०२

**श्री.सुरेश जगन्नाथ पाटील** **-----**
**अपीलार्थी**
**मु.पो. पुणार्थ नगर, सद्‌गुरु ऑटो जवळ,**
**मावळ, ता. मावळ, जि. जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी** **-----उत्तरवादी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,**
**मावळ, ता. मावळ, जि. जळगांव.**

**२.जन माहिती अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,**
**मावळ, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. सुरेश जगन्नाथ पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५/०४/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. २७/११/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१०/१०/२००८ रोजी अर्ज करुन न्युक्लिअर्स युवक युवतींना एक्सपर्ट एज्युकेशन इन कॉम्प्यूटर टिचर (EECT) प्रशिक्षण देणेबाबतची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मागितलेली माहिती दिली. परंतु अपीलार्थीचे त्यामुळे समाधान झाले नाही. माहिती अपूर्ण स्वरुपात दिली गेल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय

प्राधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

अपिलीय अधिकारी प्रथम प्रकल्प अधिकारी यांनी अपीलार्थीस अपूर्ण राहिलेली माहिती दिनांक ७/०१/२००९ रोजीच्या पत्रान्वये दिली. परंतु अपीलार्थींनी माहिती अपूर्ण, चुकीची व न मागितलेली दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. परंतु अपीलार्थी गैरहजर होते त्यामुळे अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार कोणती माहिती चुकीची दिली अथवा न मागितलेली दिली याचा बोध होत नाही.

अपील सुनावणीच्या वेळी माहितीच्या अधिकारांत मागितलेली माहिती प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्देशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१ डिसेंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.